सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# • भारतीय वन अधिनियम, १९२७

**(महाराष्ट्र राज्याकरिता लागू असल्याप्रमाणे)**

(८ जानेवारी, २०१८ पर्यंतच्या सुधारणांसह)

मराठी अनुवाद

# • महाराष्ट्र वन नियमावली, २०१४

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | | पान क्र. |
|---|---|---|
| १) | **भारतीय वन अधिनियम, १९२७**<br>(महाराष्ट्र राज्याकरिता लागू असल्याप्रमाणे)<br>(८ जानेवारी, २०१८ पर्यंतच्या सुधारणांसह)<br>मराठी अनुवाद | १ |
| २) | **महाराष्ट्र वन नियमावली, २०१४** | ४९ |
| ३) | **भारतीय वन अधिनियम अंतर्गत प्रदत्त वैधानिक शक्ती**<br>• शासन अधिसूचना दिनांक ३ एप्रिल, १९९७<br>• शासन अधिसूचना दिनांक २१ मे, २०१३<br>• शासन अधिसूचना दिनांक १९ ऑगस्ट, २०१४<br>• शासन अधिसूचना दिनाक २२ जुलै, २०१५<br>• भारतीय राजपत्र दिनांक ८ जानेवारी, २०१८ | ८९ |

# अनुक्रमणिका


**प्रकरण १** पान क्र.१

**प्रारंभिक**

कलम

१. संक्षिप्त नाव आणि व्याप्ती
२. व्याख्या
२ए. केंद्रीय किंवा मुंबई अधिनियमासंबंधीच्या विवक्षित उल्लेखाचा अर्थ लावणे

**प्रकरण २** पान क्र. ३

**राखीव वनाबाबत**

३. वने राखीव करण्याची शक्ती
४. राज्य शासनाकडून अधिसूचना
५. वन हक्क उपार्जित होण्यास मनाइ
६. वन जमाबंदी अधिका-याद्वारे उद्घोषणा
७. वन जमाबंदी अधिका-याद्वारे चौकशी
८. वन जमाबंदी अधिकारी यांची शक्ती
९. हक्क नष्ट होणे
१०. स्थलांतर करुन शेती करण्याच्या प्रघातासंबंधी दावे हाताळणे
११. ज्या जमिनीवर हक्क आहे म्हणून दावे प्रस्तुत करण्यात आले असेल ती जमीन संपादन करण्याची शक्ती
१२. कुरणविषयी किंवा वनउत्पादनावरील हक्काविषयी प्रस्तुत असलेल्या दाव्याबाबत आदेश
१३. वन जमाबंदी अधिका-यांनी तयार करावयाचा अभिलेख
१४. त्याने दावे मान्य केले असेल तेव्हा करावयाची नोंद
१५. मान्य झालेल्या हक्काची अंमलबजावणी
१६. आर्थिक मोबदल्याव्दारे हक्क संपुष्टात आणणे
१७. कलम ११, कलम १२, कलम १५, किंवा कलम १६ खाली पारित करण्यात आलेल्या आदेशावर अपिल
१८. कलम १७ खाली करावयाचे अपिल
१९. वकील
२०. वने राखीव झाल्याचे अधिसूचनेव्दारे घोषीत करणे
२१. अशा अधिसूचनेचा अनुवाद वनाच्या शेजारी प्रसिध्द करणे
२२. कलम १५ किंवा कलम १८ खाली असलेल्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची शक्ती
२३. यापुढील तरतूदी व्यतिरिक्त राखीव वनात कोणतेही हक्क संपादित करता येणार नाही
२४. मान्यतेशिवाय हक्क दुस-याच्या स्वाधीन होणार नाही
२५. राखीव वनात रस्ते व जलमार्ग बंद करण्याबाबत
२६. अशा वनात मनाई केलेली कृत्ये
२७. वन राखीव आहे, असे यापुढे समजू नये असे जाहीर करण्याची शक्ती

**प्रकरण ३** पान क्र.१४

**ग्राम वनांबाबत**

२८. ग्राम वने बनविणे

**प्रकरण ३ए** पान क्र.१४

**अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउत्पादनासंबंधी**

२८ए. --

पान क्र.१५

## प्रकरण ४
## संरक्षित वनांबाबत

२९. संरक्षित वने
३०. वृक्ष, इत्यादी राखून ठेवण्याबाबत अधिसूचना निर्गमित करण्याची शक्ती
३१. अशा अधिसूचनेचा अनुवाद लागून असलेल्या क्षेत्रात प्रसिध्द करणे
३२. संरक्षित वनासाठी नियम करण्याची शक्ती
३३. कलम ३० अन्वये निर्गमित अधिसूचनेचे किंवा कलम ३२ अन्वये केलेल्या नियमांचे उल्लंघन करुन केलेल्या कृत्याबद्दल शास्ती
३४. या प्रकरणातील कोणत्याही तरतुदींमुळे विवक्षित बाबतीत केलेल्या कृत्यास मनाई असणार नाही

पान क्र.१९

## प्रकरण ५
## शासनाची मालमत्ता नसलेली वने व जमीनीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

३४ए. अर्थविवरण
३५. विशिष्ट कारणासाठी वनाचे संरक्षण करणे
३६. वनाचे व्यवस्थापन (स्वत:कडे) घेण्याची शक्ती
३६ए. कलम ३६ अन्वये नोटीस आणि आदेश बजाविण्याची रीत
३६बी. नियंत्रणाची मुदत
३६सी. नियंत्रण रद्द करणे
३७. विशिष्ट बाबतीत वनाची मालकी काढून घेण
३८. मालकाच्या विनंती वरुन वनाचे संरक्षण करणे

पान क्र.२३

## प्रकरण ६
## इमारती लाकडे व इतर वन उत्पादन यावर आकारावयाच्या शुल्काबाबत

३९. इमारती लाकूड आणि इतर वन उत्पादन यावर शुल्क आकारण्याची शक्ती
४०. खरेदीच्या रकमेत किंवा स्वामित्व रकमेत मर्यादा लागू राहणार नाही

पान क्र.२४

## प्रकरण ७
## वाहतुक होत असतांना इमारती लाकडे आणि इतर वनउत्पादनावर नियंत्रण ठेवण्याबाबत.

४१. वनउत्पादनाची वाहतूक करण्याचे विनियमन करण्यासाठी नियम करण्याची शक्ती
४१ए. इमारती लाकडाची कस्टम सिमान्तापलीकडे वाहतूक करण्याच्या संबंधात केंद्र सरकारची शक्ती
४२. कलम ४१ अन्वये केलेल्या नियमांचा भंग केल्याबद्दल शिक्षा
४३. आगारात वन उत्पादनास नुकसान पोहोचल्याबद्दल शासन व वन अधिकारी जबाबदार असणार नाहीत
४४. आगारात अपघात झाल्याच्या प्रसंगी सर्व व्यक्तींनी मदत करणे

पान क्र.२८

## प्रकरण ८
## प्रवाहाधीन आणि काठांना लागलेली इमारती लाकडे गोळा करण्याबाबत

४५. विवक्षित जातीच्या इमारती लाकडावरील हक्क सिध्द करण्यात येईपर्यंत ती सरकारची मालमत्ता आहे, असे मानले जाईल व ती त्याप्रमाणे गोळा करता येईल
४६. प्रवाहाधीन इमारती लाकडावर दावा सांगणा-या व्यक्तींना नोटीस देणे
४७. अशा इमारती लाकडावर प्रस्तुत दाव्यासंदर्भात कार्यपध्दती
४८. ज्यावर दावा सांगण्यात आला नाही अशा इमारती लाकडाची विल्हेवाट लावणे
४९. अशा इमारती लाकडास पोहोचलेल्या नुकसानीबद्दल शासन व त्याचे अधिकारी जबाबदार असणार नाहीत
५०. इमारती लाकडे दावा सांगणा-या व्यक्तीच्या स्वाधीन करण्यापूर्वी त्याने द्यावयाची रक्कम
५१. नियम करण्याची व शास्ती निहित करण्याची शक्ती

**प्रकरण ९** पान क्र.३१

**शिक्षा आणि कार्यपध्दती**

५२. (सरकारजमा) होण्यास पात्र असलेली मालमत्ता जप्त करणे
५३. कलम ५२ अन्वये जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्याची शक्ती
५४. जप्तीचे प्रतिवृत्त प्राप्त झाल्यावर दंडाधिका-याने अनुसरावयाची पध्दती
५५. वन-उत्पादन, औजारे, इत्यादी सरकारजमा केली जाण्यास केव्हा पात्र ठरेल
५६. ज्या उत्पादनाच्या संबंधात वन अपराध करण्यात आला असेल, त्या अपराधाची संपरीक्षा संपुष्टात आल्यावर त्या उत्पादनाची विल्हेवाट लावणे
५७. वन अपराध करणारा ज्ञात नसेल किंवा सापडणे शक्य नसेल तेव्हाची कार्यपध्दती
५८. कलम ५२ अंतर्गत जप्त करण्यात आलेल्या नाशवंत मालमत्तेबाबत कार्यपध्दती
५९. कलम ५५, कलम ५६ किंवा कलम ५७ खाली आदेशाविरुध्द अपील
६०. मालमत्ता शासनाकडे केव्हा निहित होईल
६१. जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्याच्या शक्तीचा बचाव
६१ए. जेथे वन अपराध करण्यात आला असल्याची खात्री असेल तेव्हा वन अधिका-याद्वारे वनउत्पादन सरकार जमा करण
६१बी. कलम ६१ए खाली मालमत्ता सरकारजमा करण्यापूर्वी कारण दाखवा नोटीस जारी करणे
६१सी. पुर्नविलोकन
६१डी. अपील
६१ई. सरकारजमा बाबतचा निवाडा इतर शिक्षेस बाधित करणार नाही
६१एफ. सरकारजमा केलेली मालमत्ता, इत्यादी शासनाकडे केव्हा निहित होईल
६१जी. विवक्षित प्रकरणी अधिकारितेस रोध
६२. अन्याय्याने केलेल्या जप्तीबद्दल शिक्षा
६३. वृक्षावर व इमारती लाकडावर बनावट चिन्हे करण्याबद्दल किंवा त्यावरील चिन्हे खराब करण्याबद्दल आणि हद्दीच्या चिन्हात बदल करण्याबद्दल शास्ती
६४. अधिपत्रावाचून अटक करण्याची शक्ती
६५. अटक केलेल्या व्यक्तीने बंधपत्र लिहुन दिल्यावर त्यास सोडून देण्याची शक्ती
६५ए. विवक्षित अपराध अजामीनपात्र असणे
६६. अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याची शक्ती
६६ए. --
६७. अपराधाची संपरीक्षा करण्याची शक्ती
६८. अपराधाची तडजोड करण्याची शक्ती
६९. वन उत्पादन सरकारच्या मालकीचे आहे असे गृहीत धरणे

**प्रकरण १०** पान क्र.४१

**गुरांचा अपप्रवेश**

७०. गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ लागु होणे
७१. त्या अधिनियमान्वये ठरवून दिलेल्या दंडात बदल करण्याची शक्ती

**प्रकरण ११** पान क्र.४१

**वन अधिका-यांबाबत**

७२. राज्य शासन वन अधिका-यांकडे काही विवक्षित शक्ती निहित करु शकते
७३. वनअधिकारी लोकसेवक मानण्यात येतील
७४. सद्भावपूर्वक केलेल्या कृत्याबद्दल हानिरक्षण
७५. वन अधिका-यांना व्यापार करता येणार नाही

## प्रकरण १२
## दुय्यम नियम

पान क्र.४२


७६. नियमावली तयार करण्यासाठी अतिरीक्त शक्ती

७७. नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती

७८. नियमांना विधीचा अंमल केव्हा प्राप्त होईल


## प्रकरण - १३
## संकिर्ण

पान क्र.४३


७९. वन अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना सहाय्य देण्यासाठी बांधील असलेल्या व्यक्ती

८०. शासनाची व इतर व्यक्तींची सामाईक मालमत्ता असलेल्या वनाचे व्यवस्थापन

८०ए. शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिका-याच्या विवक्षित जमिनीस हया अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्याचे शासनाचे अधिकार

८१. ज्या सेवेबद्दल शासकीय वनाच्या उत्पादनातील हिस्स्याचा उपभोग घेण्यात येत असेल ती सेवा करण्यात कसूर करणे

८२. शासनाला येणे असलेली रक्कम वसूल करणे

८३. अशा रक्कमेबद्दल वन उत्पादनावर धारणाधिकार असणे

८४. या अधिनियमान्वये जमिनीची आवश्यकता असेल तेव्हा भूमि संपादन अधिनियम, १८९४ खाली सार्वजनिक प्रयोजनासाठी तिची आवश्यकता आहे असे मानण्यात येईल

८५. बंधपत्रान्वये येणे असलेल्या शास्तीची वसुली करणे

८५ए. केन्द्र शासनाच्या हक्कांचा बचाव

८६. रद्द केलेले विधी

# १९२७ चा अधिनियम क्रमांक १६

# भारतीय वन अधिनियम, १९२७

*[२१ सप्टेंबर, १९२७]*

## वने, वन उत्पादनाची वाहतूक व इमारती लाकूड व अन्य वन उत्पादनांवर आकारीय सेवा शुल्क याच्याशी निगडीत कायद्याचे एकत्रीकरण करण्यास उद्देशित अधिनियम.

ज्याअर्थी, वने, वन उत्पादनाची वाहतूक व इमारती लाकूड व अन्य वन उत्पादनांवर आकारीय सेवा शुल्काबाबत असलेल्या कायद्याचे एकत्रीकरण करणे समयोचीत आहे; त्याअर्थी यास याव्दारे अधिनियमित करण्यात येत आहे:-

## प्रकरण १

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव आणि व्याप्ती.**- (१) या अधिनियमास भारतीय वन अधिनियम, १९२७ असे संबोधण्यात येईल.

(२) तो [महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्राव्यतिरीक्त] इतर जे प्रदेश दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ च्या निकटपूर्वी भाग बी राज्यात समाविष्ट होते, ते प्रदेश खेरीज करुन संपूर्ण भारतात लागू असेल.

(३) तो, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ च्या निकटपूर्वी जे प्रदेश बिहार, बॉम्बे, कुर्ग, दिल्ली, मध्यप्रदेश, ओरीसा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात समाविष्ट होते त्या प्रदेशांना लागू असेल, परंतु कोणतेही राज्याचे सरकार राजपत्रात केलेल्या अधिसूचनेव्दारे हा अधिनियम त्या राज्याचे संपूर्ण किंवा कोणत्याही विशिष्ट भागात तो लागू आहे आणि अंमलात नाही, अंमलात आणू शकेल.

परंतु असे की, भारतीय वन (महाराष्ट्र एकीकरण आणि सुधारणा) अधिनियम, १९६० अंमलात आल्यानंतर हा अधिनियम महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात अंमलात राहील.

**२. व्याख्या.**- या अधिनियमात, काहीही प्रतिकूल विषय किंवा संदर्भ असल्याशिवाय, -

(१) "गुरे" या शब्दात हत्ती, उंट, म्हशी, घोडे, घोडया, खच्ची केलेले घोडे, तट्टू, शिंगरे, शिंग्या, खेचरे, गाढव, डुकरे, एडके, मेंढया, मेंढरे, कोकरे, शेळया आणि करडे यांचा समावेश होतो;

(२) "वन-अधिकारी" याचा अर्थ या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उद्देश पार पाडण्यासाठी किंवा या अधिनियमाखाली किंवा तदनुसार केलेल्या नियमाखाली वन अधिका-याव्दारे जी कृती करणे ईष्ट आहे,

ती कृती करण्यासाठी राज्य शासन किंवा राज्य शासनाकडून शक्ती प्रदान केलेला कोणताही अधिकारी ज्यास नेमू शकेल, असा कोणताही व्यक्ती;

(३) "वन अपराध" याचा अर्थ या अधिनियमाखाली किंवा तदनुसार केलेल्या कोणत्याही नियमाखाली शिक्षेस पात्र असलेला अपराध;

(४) "वन-उत्पादन" या शब्दात -

(ए) खालील वस्तू, त्या वनात सापडलेल्या असोत किंवा वनातून आणलेल्या असोत किंवा नसोत, म्हणजेच :-

इमारती लाकूड, कोळसा, कुचकरबर (caoutchouc), काथ, लाकडाचे तेल, राळ, नैसर्गिक वार्निश, साल, लाख, मोहाची फुले, मोहाच्या बीया, कुथ, आपटयाची आणि टेंमुर्णीची पाने, रोशा गवत (व त्यापासून तयार केलेले तेल) रौवलफिया सर्पेटीना (rauwolfia serpentina) आणि त्रीफळ (मीरॅबोलॉन), आणि

(बी) खालील वस्तू, त्या वनात सापडल्या असतील किंवा वनातून आणलेल्या असतील, म्हणजेच :-

(i) वृक्ष व पाने, फुले आणि फळे आणि वृक्षाचे यात यापूर्वी नमूद केले नसलेले सर्व भाग किंवा उत्पन्न,

(ii) वृक्ष नसलेली रोपे (गवत, वेली, रीड्स व शेवाळ यासह) व अशा रोपांचे सर्व भाग किंवा उत्पन्न,

(iii) वन्यप्राणी आणि कातडी, सुळे, शिंगे, हाडे, रेशीम, रेशीम कोष, मध आणि मेण आणि प्राण्यांचे इतर सर्व भाग किंवा उत्पन्न, आणि

(iv) कुजलेल्या झाडाचे सरपण (पीट), भूपृष्ठ, माती, खडक आणि खनिज पदार्थ (चुनखडी, जांभा दगड (लॅटेराईट), खनिज तेले, आणि खाणी किंवा दगडाच्या खदानी पासून उत्पन्न होणारे पदार्थ धरुन), समावेष होतो.

(४ए) "मालक" या शब्दात पाल्याधिकरणाच्या देखरेखीखाली किंवा त्याच्या स्वाधिन असलेल्या मालमत्तेच्या संबंधात अशा पाल्याधिकरणाचा समावेश होतो.

(४बी) "पोलीस अधिकारी" याचा अर्थ मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला पोलीस अधिकारी.

(४सी) "महसूल अधिकारी" याचा अर्थ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला महसूल अधिकारी.

५. "नदी" या शब्दात कोणताही ओढा, कालवा, खाडी किंवा इतर प्रकारचे नैसर्गिक किंवा कृत्रिम पाण्याचे पाट यांचा समावेष होतो.

६. "इमारती लाकूड" या शब्दात पडलेले किंवा पाडलेले वृक्षांचा आणि सर्व लाकडे, मग ती कोणत्याही कारणासाठी किंवा कारणावाचून कापलेली, घडविलेली अथवा पोखरलेली असोत किंवा नसोत, यांचा समावेष होतो; आणि

७. "वृक्ष" या शब्दात ताड (पाम) खूंट, झुडूप आणि वेत यांचा समावेश होतो.

• [मा. राज्यपाल यांनी जारी केलेल्या अधिसूचना क्र. RB/TC/e-११०९(१५)(२०१४)/Notification-३/Bamboo/mfp/७४१, दिनांक १९.०८.२०१४ अन्वये अनुसूचित क्षेत्राकरीता उक्त व्याख्येतून बांबू, खूंट, झुडूप व्याप्त क्षेत्र, हे शब्द गाळण्यात आले आहेत. म्हणजेच अनुसूचित क्षेत्रात "वृक्ष" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे राहील]:-

"वृक्ष" या शब्दात ताड (पाम) याचा समावेश होतो.

• [भारतीय राजपत्र दि. 8 जानेवारी 2018 THE INDIAN FOREST (AMENDMENT) ACT, 2017 No. 5 OF 2018 अन्वये कलम 2 (7) ''वृक्ष'' या व्याख्येतून 'बांबू' हा शब्द वगळण्यात आलेला आहे.]

**(२ए). केंद्रीय किंवा मुंबई अधिनियमासंबंधीच्या विवक्षित उल्लेखाचा अर्थ लावणे.-** महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाव्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रदेशास हा अधिनियम लागू करतांना, केंद्रीय किंवा मुंबई अधिनियमाच्या तरतूदीसंबंधी कोणताही उल्लेख, हा त्या प्रदेशात असा कोणताही तत्सम विधी अंमलात असेल त्या विधीच्या तरतूदीसंबंधी केलेला उल्लेख असल्याचा समजून त्याचा अर्थ लावण्यात येईल.

## प्रकरण २
## राखीव वनाबाबत

**३. वने राखीव करण्याची शक्ती.-** जी कोणतीही वन जमीन किंवा पडीत जमीन शासनाची मालमत्ता असेल किंवा जिच्यावर शासनाचे स्वामित्व अधिकार असतील किंवा, संपुर्ण वनउत्पादन किंवा त्याच्या कोणत्याही भागावर शासनाचा हक्क असेल, त्यास राज्य शासन यापुढे तरतूद केलेल्या रितीने राखीव वन म्हणून गठित करु शकेल.

**४. राज्य शासनाकडून अधिसूचना.-** (१) जेव्हा-जेव्हा कोणतीही जमीन राखीव वन म्हणून गठित करण्याचे ठरविण्यात येईल, तेव्हा राज्य शासन पुढील गोष्टीच्या संदर्भात राजपत्रात एक अधिसूचना जारी करुन -

(ए) अशी जमीन राखीव वन म्हणून गठित करण्याचे ठरविण्यात आहे, असे जाहीर करेल -

(बी) अशा जमीनीचे ठिकाण व त्याची सीमा यथाशक्य विर्निदिष्ट करेल ; आणि

(सी) उक्त सीमेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमीनीत किंवा अशा जमीनीवर किंवा वनउत्पादनात किंवा अशा उत्पादनावर कोणत्याही व्यक्तीच्या नावे जे कोणतेही हक्क अस्तित्वात असल्याबद्दल सांगण्यात आले असेल, त्या हक्कांचे अस्तित्व, स्वरुप व व्याप्ती याविषयी चौकशी करण्यासाठी आणि

त्या गोष्टी ठरविण्यासाठी तसेच त्याचे संबंधित या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी एका अधिका-याची (ज्यास यापुढे "वन जमाबंदी अधिकारी" म्हणून संबोधण्यात येईल) नेमणूक करेल.

**स्पष्टीकरण:-** खंड (बी) च्या प्रयोजनार्थ वनाच्या सीमेचे रस्ते, नदया, पर्वतरांगा व इतर ख्यातनाम व सहजरित्या समजण्यासारख्या हद्दी याचेद्वारे वर्णन करणे पुरेसे राहिल.

(२) पोट कलम १ खंड (सी) खाली नेमलेला अधिकारी, हा सामान्यत: वन जमाबंदी अधिकारी या पदाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वन कार्यालयाचा प्रभार धारण करणारा व्यक्ती नसेल.

(३) या कलमातील कोणत्याही तरतूदीमुळे राज्य शासनास या अधिनियमाखाली वन जमाबंदी अधिका-यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, तीन पेक्षा अधिक नसतील, इतके अधिकारी नेमण्यास प्रतिबंध राहणार नाही, त्यापैकी एकाहून अधिक अधिकारी, वन जमाबंदी अधिका-याची कर्तव्ये बजाविण्याच्या प्रयोजनार्थ वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही वन कार्यालयाचा प्रभार धारण करणारा व्यक्ती नसेल.

**५. वन हक्क उपार्जित होण्यास रोध.-** कलम ४ खाली अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर अशा अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या जमीनीत किंवा जमीनीवर उत्तराधिकारी व्यक्ती अथवा एखाद्या अधिकारपत्रांन्वये किंवा लेखी करारान्वये असेल, त्या व्यतिरीक्त इतर कोणत्याही रितीने कोणतेही हक्क संपादित करता येणार नाहीत; मात्र ज्या अधिकारपत्रांन्वये किंवा लेखी करारान्वये असे हक्क संपादित करता येतील, ती अधिकारपत्रे किंवा करार, शासनाने किंवा शासनाच्या वतीने, किंवा अशी अधिसूचना ज्यावेळी काढण्यात आली, त्यावेळी असा हक्क ज्या व्यक्तीकडे निहित झाला होता, त्या व्यक्ती व्यतिरिक्त, राज्य शासनाने त्या संबंधात केलेल्या नियमास अनुसरल्यावाचून अशी कोणतीही जमीन, लागवड करण्याकरीता किंवा इतर कोणत्याही कारणाकरीता नव्याने साफ केली जाणार नाही.

**६. वन जमाबंदी अधिका-याद्वारे उद्घोषणा.-** जेव्हा कलम ४ अन्वये अधिसूचना निर्गमित झाली असेल, तेव्हा वन जमाबंदी अधिकारी हा, अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या जमीनीच्या जवळपास असलेल्या प्रत्येक शहरात व गावात स्थानिक देशी भाषेत एक उद्घोषणा प्रसिध्द करेल. आणि अशा उद्घोषणेद्वारे;

(ए) प्रस्तावित वनाचे ठिकाण व त्याची सीमा यथाशक्य विर्निदिष्ट करेल.

(बी) अशा वनाचे राखीवकरण झाल्यानंतर ज्याबाबत त्यात यापुढे तरतूद केल्यारितीने जे परिणाम घडून येतील त्याचे स्पष्टीकरण करेल; आणि

(सी) अशा उद्घोषणेच्या तारखेपासून तीन महिन्यापेक्षा कमी नसेल, अशी मुदत ठरवून देईल; आणि अशा मुदतीच्या आंत कलम ४ किंवा कलम ५ यात नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही हक्काबाबत दावा प्रस्तुत करणा-या प्रत्येक व्यक्तीव्दारे; एकतर वनजमाबंदी अधिका-यास लेखी नोटीस देवून तीत

अशा हक्काचे स्वरुप व त्याबाबत त्याचेकडून मागणी करण्यात येईल, अशा नुकसानभरपाईबद्दलचा तपशील आणि रक्कम (जर असेल तर) नमूद करील किंवा त्याला वनजमाबंदी अधिका-यापुढे हजर होवून उपरोक्त तपशील प्रस्तुत करण्याविषयी कळवेल.

**७. वन जमाबंदी अधिका-याद्वारे चौकशी.-** वन जमाबंदी अधिकारी हा, कलम ६ खाली करण्यात आलेली सर्व निवेदने अभिलिखित करेल, आणि त्या कलमाखाली रितसर प्रस्तुत झालेल्या सर्व दाव्यांबाबत आणि कलम ४ व कलम ५ मध्ये उल्लेख केलेल्या आणि कलम ६ अंतर्गत प्रस्तुत न झालेल्या कोणत्याही हक्काच्या अस्तित्वाबाबत; असे दावे व हक्क शासकीय अभिलेख्यावरुन, आणि त्याविषयी माहिती असलेल्या कोणत्याही संभाव्य व्यक्तीकडून खात्री करण्यायोग्य प्राप्त पुराव्याच्या आधारावर, सोयीस्कर असलेल्या ठिकाणी चौकशी करेल.

**८. वन जमाबंदी अधिकारी यांची शक्ती.-** अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ वन जमाबंदी अधिकारी पुढील शक्तीचा वापर करु शकेल, म्हणजेच-

(ए) त्यास स्वत: किंवा त्यांने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास कोणत्याही जमीनीवर प्रवेश करण्याची, सर्वेक्षण करण्याची, तिच्या हद्दी आखण्याची आणि तिचे नकाशे तयार करण्याची शक्ती; आणि

(बी) दाव्यांची संपरीक्षा करतांना दिवाणी न्यायालयाच्या शक्ती.

**९. हक्क नष्ट होणे.-** कलम ६ अंतर्गत प्रस्तुत न झालेले आणि कलम ७ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीत ज्यांचे अस्तित्वाविषयी माहिती मिळाली नसेल, अशा हक्कांबाबत कलम ६ खाली ठरविण्यात आलेल्या मुदतीत पुरेशा कारणांमुळे दाखल केला जाऊ शकला नाही, याबद्दल कलम २० खाली अधिसूचना प्रसिध्द होण्यापूर्वी असा दावा सांगणा-या व्यक्तीव्दारे वन जमाबंदी अधिकारी यांचे समाधान केल्याशिवाय असे हक्क नष्ट होतील.

**१०. स्थलांतर करुन शेती करण्याच्या प्रघातासंबंधी दावे हाताळणे.-** (१) स्थलांतर करुन शेती करण्याच्या प्रघातासंबंधी दावा करण्यात आला असेल, त्या बाबतीत वन जमाबंदी अधिकारी अशा दाव्याविषयी तसेच ज्या कोणत्याही स्थानिक नियमाखाली किंवा आदेशाखाली असा प्रघात चालू किंवा विनियमित असेल, त्या नियमाविषयी किंवा आदेशाविषयी दर्शविणा-या तपशीलाची नोंद करुन घेईल, आणि असे प्रघात सर्वस्वी किंवा अंशत: मान्य करण्याविषयी किंवा प्रतिबंधित करण्याविषयी स्वत:चे अभिप्रायासह तो तपशील राज्य शासनाकडे सादर करील.

(२) असे तपशील व अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर राज्य शासन असा प्रघात सर्वस्वी किंवा अंशत: मान्य करण्याविषयी किंवा प्रतिबंधित करण्याविषयी आदेश पारित करु शकेल.

(३) जर असा प्रघात सर्वस्वी किंवा अंशत: चालु ठेवण्यास परवानगी प्राप्त असेल तर त्याची अंमलबजावणी करता यावी, म्हणून वन जमाबंदी अधिका-यास -

(ए) ज्यायोगे दावेदारांच्या प्रयोजनासाठी पुरेशा मर्यादेपर्यंत असलेल्या योग्य प्रकारची आणि वाजवीरीत्या सोयीस्कर ठिकाणी असलेली जमीन वेगळी काढून ठेवता येईल, अशा रितीने जमाबंदीखाली असलेल्या जमीनीच्या सीमेत बदल करता येईल, किंवा

(बी) जमाबंदीखाली असलेल्या जमीनीच्या विवक्षित भागाची वेगळयाने हद्दी आखून देण्याची व्यवस्था करुन, अशा भागात दावेदारांना त्याजकडून विहित करण्यात येईल, अशा शर्तीवर स्थलांतर करुन शेती करण्यासाठी परवानगी देता येईल.

(४) पोट कलम ३ खाली केलेली सर्व व्यवस्था राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहतील.

(५) स्थलांतर करुन शेती करण्याचा प्रघात हा सर्व बाबतीत, राज्य शासनाकडून नियंत्रित केला जाण्यास, निर्बंधित केला जाण्यास व नाहीसा केला जाण्यास पात्र असलेली एक विशेष सवलत आहे, असे मानले जाईल.

**११. ज्या जमिनीवर हक्क आहे म्हणून दावे प्रस्तुत करण्यात आले असेल ती जमीन संपादन करण्याची शक्ती.-** (१) कोणत्याही जमीनीत किंवा जमीनीवर, रस्त्याचा किंवा कुरणाचा किंवा वनउत्पादनावरील किंवा पाटाच्या पाण्यावरील हक्काखेरीज इतर कोणत्याही स्वरुपाच्या हक्काविषयी दावे प्रस्तुत करण्यात आले असतील तर याबाबत वन जमाबंदी अधिकारी असे कोणतेही दावे सर्वस्वी किंवा अंशत: मान्य करण्याबाबत किंवा अमान्य करण्याबाबत आदेश पारित करील.

(२) अशा प्रकारचे दावे सर्वस्वी किंवा अंशत: मान्य करण्यात आले असतील, तर वन जमाबंदी अधिकारी एकतर-

(i) अशी जमीन प्रस्तावित वनाचे सीमेतून वगळेल; किंवा

(ii) तिच्या मालकाने त्याचा हक्क समर्पित करण्याबाबत त्याचेबरोबर करार करेल ; किंवा

(iii) भूमि संपादन अधिनियम, १८९४ यात तरतूद केल्यारितीने अशा जमीनीचे संपादन करण्याबाबतची कार्यवाही सुरु करेल

(३) अशी जमीन संपादन करण्याचे प्रयोजनार्थ -

(ए) वन जमाबंदी अधिकारी, हा भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये कामकाज चालविणारा जिल्हाधिकारी म्हणून मानला जाईल;

(बी) दावेदार, हा कलम ९ खाली नोटीसीच्या अनुसार त्याच्या पुढे हजर होणारा हितसंबंधी व्यक्ती आहे, असे मानले जाईल;

(सी) त्या अधिनियमाच्या पूर्ववर्ती कलमाच्या तरतूदीचे पालन करण्यात आले आहे, असे मानले जाईल; आणि

(डी) जिल्हाधिका-यास दावेदारांच्या संमतीने किंवा न्यायालयास उभय पक्षकारांच्या संमतीने जमिनीचे स्वरुपात अथवा अंशतः जमीनीच्या आणि अंशतः आर्थिक स्वरुपात मोबदला देण्याविषयी निवाडा देता येईल.

**१२. कुरणविषयी किंवा वनउत्पादनावरील हक्काविषयी प्रस्तुत असलेल्या दाव्याबाबत आदेश.-** (१) कुरणबाबत हक्काविषयी किंवा वनउत्पादनावरील हक्काविषयी प्रस्तुत असलेल्या दाव्याच्या बाबतीत, वन जमाबंदी अधिकारी असे दावे सर्वस्वी किंवा अंशतः मान्य किंवा अमान्य करण्याबाबत आदेश पारित करेल.

(२) वन जमाबंदी अधिकारी, हा पोट कलम (१) खाली पारीत केलेल्या आदेशाची एक प्रत दावेदारास आणि त्या आदेशाची दुसरी प्रत चौकशीच्या वेळी उपस्थित राहिलेल्या वन अधिका-यास किंवा असा कोणताही अधिकारी उपस्थित राहिला नसेल तर विभागीय वन अधिका-याकडे पाठवेल.

**१३. वन जमाबंदी अधिका-यांनी तयार करावयाचा अभिलेख.-** कलम १२ खाली कोणताही आदेश पारित करतांना वन जमाबंदी अधिकारी यथाशक्य असेल, तेथवर पुढील नोंदी करील -

(ए) अशा हक्कासंबंधी दावे प्रस्तुत करणा-या व्यक्तीचे नाव, त्याच्या वडीलाचे नाव, जात, राहण्याचे ठिकाण व धंदा; आणि

(बी) ज्या शेताच्या किंवा शेतसमूहाच्या संबंधात (काही असल्यास) आणि सर्व इमारतीबाबत (कोणत्याही असल्यास) अशा प्रकारचे हक्क चालविण्याविषयी दावा प्रस्तुत करण्यात आला असेल, त्या सर्व शेतांची क्रिंवा त्या शेतसमूहांची नावे, त्याचे ठिकाण व क्षेत्रफळ, आणि त्या सर्व इमारतींची नावे व ठिकाण.

**१४. त्याने दावे मान्य केले असेल तेव्हा करावयाची नोंद.-** वन जमाबंदी अधिका-यांने जर कलम १२ खाली कोणताही दावा सर्वस्वी किंवा अंशतः मान्य केला असेल, तर ज्या व्याप्तीपर्यंत अशा रितीने दावा मंजूर करण्यात आला, ती तो अभिलिखित करेल. त्याचबरोबर त्यांनी पुढील गोष्टी, म्हणजे दावेदारास जी गुरे वनात चारण्याचा वेळोवेळी हक्क असेल त्या गुरांची संख्या व त्यांचे वर्णन, ज्या हंगामात अशा प्रकारे गुरे चारण्याची परवानगी देण्यात आली असेल तो हंगाम, जे इमारती लाकूड आणि इतर वनउत्पादन वेळोवेळी घेण्याचा किंवा मिळण्याचा त्यास हक्क देण्यात आला आहे, त्या इमारती लाकडाचे आणि इतर वनउत्पादनाचे परिमाण आणि प्रसंगानुसार आवश्यक असेल, असा इतर तपशील, हया गोष्टी सुध्दा निर्दिष्ट करील तसेच, ज्या हक्काविषयी दावा सांगण्यात आला होता ते हक्क

उपभोगून मिळविलेली इमारती लाकडे किंवा इतर वनउत्पादन त्यास विकता येईल किंवा त्याची त्यास अदलाबदल करता येईल किंवा कसे, याचीही वन जमाबंदी अधिकारी नोंद करेल.

**१५. मान्य झालेल्या हक्काची अंमलबजावणी.-** (१) अशारितीने अभिलेख तयार केल्यानंतर वन जमाबंदी अधिकारी हा, यथाशक्ती तसेच ज्या राखीव वनासंबंधात दावे उपस्थित करण्यात आले असतील ते वन सुस्थितीत राखले जाईल, याचा योग्य रितीने विचार करुन, अशा प्रकारे मंजूर करण्यात आलेले हक्क अखंडपणे उपभोगले जातील, याची सुनिश्चिती करणारा आदेश पारीत करेल.

(२) या प्रयोजनार्थ वन जमाबंदी अधिकारी हा.-

(ए) दावेदारांच्या प्रयोजनार्थ सोयीस्कर असलेल्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात असलेले काही इतर वनक्षेत्र विवक्षित करु शकेल, आणि दावेदारांना गुरे चारण्यासंबंधी किंवा (यथास्थितीत) वनउत्पादनासंबंधी हक्क ज्याप्रमाणात मान्य करण्यात आला होता, त्याप्रमाणात हक्क प्रदान करण्याविषयी आदेश अभिलिखित करु शकेल.

(बी) दावेदारांच्या प्रयोजनार्थ पुरेशा मर्यादेपर्यंत असलेली व वाजवीरित्या सोयीस्कर ठिकाण असेल, अशी वन जमीन वेगळी काढून ठेवता येईल, अशा रितीने प्रस्तावित वनाचे सीमेत बदल करु शकेल; किंवा

(सी) अशा दावेदारांचे कुरण किंवा यथास्थितीत वन उत्पादनाविषयी अशा प्रकारे ज्याप्रमाणापर्यंत, ज्याहंगामात, प्रस्तावित वनाच्या अशा ज्याभागात आणि राज्य शासनाने केलेल्या ज्यानियमाखाली हक्क चालू राहतील, त्याविषयी आदेश अभिलिखित करु शकेल.

**१६. हक्क संपुष्टात आणणे.-** राखीव वन सुस्थितीत ठेवले जातील, याचा योग्य विचार करुन अशा प्रकारे मंजुर हक्कांचे अखंडपणे उपभोग करता यावे म्हणून कलम १५ खाली अशी जमाबंदी करता येणे जेव्हा वन जमाबंदी अधिकारी यांना अशक्य वाटत असेल तेव्हा तो राज्य शासन यानिमित्त जे नियम करेल त्या नियमांचे अधीन राहून त्या व्यक्तींना अशी एक ठराविक रक्कम प्रदान करुन किंवा जमीन देवून किंवा त्यास योग्य वाटेल, अशा रितीने असे हक्क संपुष्टात आणेल.

**१७. कलम ११, कलम १२, कलम १५, किंवा कलम १६ खाली पारित करण्यात आलेल्या आदेशावर अपिल.-** या अधिनियमाखाली दावा प्रस्तुत करणा-या कोणत्याही व्यक्ती किंवा राज्य शासनाव्दारे याबाबतीत सामान्य किंवा विशेषरित्या शक्तीप्रदत्त वन अधिकारी किंवा इतर व्यक्ती अशा दाव्याच्या संबंधात वन जमाबंदी अधिका-यांने कलम ११, कलम १२ कलम १५ किंवा कलम १६ खाली दिलेल्या आदेशाविरुध्द त्या आदेशाच्या तारखेपासुन तीन महिन्याच्या आत असे आदेशामुळे अपीलाची सुनावणी करण्यास राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेद्वारे ज्याची नेमणूक करेल, महसूल विभागाचे जिल्हाधिका-यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अशा अधिका-याकडे अपील प्रस्तुत करु शकेल.

परंतू असे की, राज्य शासन तीन व्यक्ती समाविष्ट असलेले एक न्यायालय (त्यास यापुढे "वन न्यायालय" म्हणून संबोधण्यात येईल) स्थापित करु शकेल; आणि जेव्हा असे वन न्यायालय स्थापन करण्यात येईल तेव्हा असे सर्व अपिले त्या न्यायालयासमोर सादर केले जातील.

**१८. कलम १७ खाली करावयाचे अपिल.-** (१) कलम १७ खाली करावयाचे प्रत्येक अपिल लेखी अर्जाच्या स्वरुपात केले जाईल आणि वन जमाबंदी अधिका-याकडे पोहचते करता येईल आणि वन जमाबंदी अधिकारी असे अपिल, जे प्राधिकरण त्या अपिलाची सुनावणी करण्यास सक्षम असेल, त्याच्याकडे विनाविलंब अग्रेषित करेल.

(२) कलम १७ खाली नेमलेल्या अधिका-याकडे असे अपिल करण्यात आले असेल, तर त्या अपिलाची सुनावणी जमीन महसूलासंबंधी बाबीवरील अपिलाची सुनावणी करण्याकरीता त्यावेळी जी रीत विहित करण्यात आली असेल, त्यारितीने करण्यात येईल.

(३) असे अपिल जर वन न्यायालयाकडे असेल तर, त्या अपिलाची सुनावणी करण्यासाठी ते न्यायालय एक तारीख व प्रस्तावित वनाच्या जवळपास असलेली एक सोयीची जागा निश्चित करेल व त्याबाबत पक्षकारांना नोटीस देऊन अशा अपिलाची सुनावणी करेल.

(४) अशा अपिलावर अशा अधिका-याने किंवा न्यायालयाने किंवा अशा न्यायालयाच्या सदस्यांच्या बहुमताने पारित करण्यात आलेला आदेश, फक्त राज्य शासनाकडून पुर्ननिरीक्षणाच्या अधीन राहून, अंतिम असेल.

**१९. वकील.-** राज्य शासनास किंवा या अधिनियमाखाली दावा प्रस्तुत करणा-या कोणत्याही व्यक्तीस वन जमाबंदी अधिका-यासमोर, किंवा अपीलीय अधिका-यासमोर किंवा न्यायालयासमोर चौकशी किंवा अपील चालू असतांना हजर होण्यासाठी, प्रतिवाद करण्यासाठी किंवा काम करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल.

**२०. वने राखीव झाल्याचे अधिसूचनेव्दारे घोषीत करणे.-** (१) जेव्हा पुढील गोष्टी घडल्या असतील म्हणजेच -

(ए) दावे दाखल करण्याविषयी कलम ६ खाली ठरवून दिलेली मुदत संपुष्टात आली असेल आणि त्या कलमान्वये किंवा कलम ९ खाली जे कोणतेही दावे प्रस्तुत झाले असतील, ते दावे वन जमाबंदी अधिका-याव्दारे निकाली काढले गेले असतील;

(बी) अशा प्रकारचे कोणतेही दावे प्रस्तुत झाले असतील आणि अशा दाव्यासंबंधी पारित करण्यात आलेल्या आदेशावर अपिल करण्यासाठी कलम १७ व्दारे ठरवून दिलेली मर्यादित मुदत संपुष्टात आली असेल आणि अशा मुदतीत सादर करण्यात आलेले सर्व अपिले (कोणतेही असल्यास) अपीलीय अधिका-याव्दारे किंवा न्यायालयाव्दारे निकाली काढली गेली असतील; आणि

(सी) वन जमाबंदी अधिका-याने प्रस्तावित वनात समाविष्ट करण्याकरीता कलम ११ खाली भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादित करण्यासाठी निवड केलेल्या सर्व जमीनी (असल्यास) त्या अधिनियमाच्या कलम १६ खाली राज्य शासनाकडे निहित झाल्या असतील,

तेव्हा राज्य शासन, जे वन राखीव करावयाचे असेल, त्याच्या सीमा, उभ्या असलेल्या सीमाचिन्हांव्दारे किंवा अन्यप्रकारे निश्चितपणे निर्दिष्ट करणारी आणि त्यास अधिसूचनेतील ठरवून दिलेल्या तारखेपासून राखीव म्हणून घोषित करणारी एक अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करेल.

(२) अशाप्रकारे ठरवून दिलेल्या तारखेपासून असे वन राखीव वन म्हणून मानले जाईल.

**२१. अशा अधिसूचनेचा अनुवाद वनाच्या शेजारी प्रसिध्द करणे.-** अशा अधिसूचनेव्दारे ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी वन अधिकारी वनाच्या शेजारी प्रत्येक शहरात व गावात त्याचा स्थानिक देशी भाषेत अनुवाद प्रसिध्द करण्याची व्यवस्था करेल.

**२२. कलम १५ किंवा कलम १८ खाली असलेल्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची शक्ती.-** कलम २० खाली कोणतीही अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून पाच वर्षांच्या आत राज्य शासन कलम १५ किंवा कलम १८ खाली असलेल्या कोणत्याही व्यवस्थेत सुधारणा करु शकेल आणि या प्रयोजनार्थ कलम १५ किंवा कलम १८ खाली करण्यात आलेला कोणताही आदेश रद्द करु शकेल किंवा त्यात फेरफार करु शकेल आणि कलम १५ मध्ये निर्दिष्ट कोणतीही प्रक्रिया, कोणत्याही अशा इतर प्रक्रियेच्या मोबदल्यात गृहित धरली जाईल किंवा कलम १२ खाली मान्य करण्यात आलेले हक्क कलम १६ खाली, संपुष्टात आणले जातील, असे निर्देशित करु शकेल.

**२३. यापुढील तरतूदी व्यतिरिक्त राखीव वनात कोणतेही हक्क संपादित करता येणार नाही.-** राज्य शासनाच्या वतीने किंवा कलम २० खाली अधिसूचना निर्गमित होतेवेळी ज्या कोणत्याही व्यक्तीकडे असे हक्क निहित झाले होते, त्याच्यावतीने लेखीस्वरुपात मंजुरीव्दारे वारसाहक्काव्यतिरिक्त किंवा कराराव्दारे प्राप्त हक्काव्यतिरिक्त राखीव वनात किंवा राखीव वनावर कोणत्याही स्वरुपाचे हक्क संपादित होणार नाही.

**२४. मान्यतेशिवाय हक्क दुस-याच्या स्वाधीन होणार नाही.-** (१) कलम २३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १५ चे पोट कलम (२) मधील खंड (सी) खाली चालू ठेवण्यात आलेला कोणताही हक्क, राज्य शासनाच्या मान्यतेशिवाय मंजूरीव्दारे, विक्रीव्दारे, भाडेपट्टी कराराव्दारे, गहाण ठेवून किंवा अन्य रितीने दुस-याचे स्वाधीन करता येणार नाही.

परंतू असे की, जेव्हा असा कोणताही हक्क, कोणतीही जमीन किंवा घराशी संलग्न असेल तर त्याची विक्री करता येऊ शकेल किंवा अन्यथा अशा जमीनीतून किंवा घरातून दुस-याच्या स्वाधीन करता येऊ शकेल.

(२) अशा हक्कांचे उपभोग करुन प्राप्त कोणतेही इमारती लाकूड किंवा इतर वन उत्पादनाची विक्री किंवा आदान-प्रदान कलम १४ खाली अभिलिखित करण्यात आलेल्या आदेशाव्दारे मंजूर प्रमाणापर्यंतचा अपवाद वगळून केली जाणार नाही.

**२५. राखीव वनात मार्ग व जलमार्ग बंद करण्याबाबत.-** राज्य शासन किंवा राज्य शासनाव्दारे याबाबतीत रितसर प्राधिकृत केलेल्या इतर अधिका-याच्या पूर्वमान्यतेने वन अधिकारी हा राखीव वनात कोणतेही सार्वजनिक किंवा खाजगी मार्ग किंवा जलमार्ग बंद करु शकेल, परंतू अशा प्रकारे बंद करण्यात आलेले मार्ग किंवा जलमार्गाऐवजी राज्य शासनास योग्य वाटत असलेला पर्याय पूर्वीच अस्तित्वात असेल किंवा त्याच्या मोबदल्यात वन अधिका-याव्दारे उपलब्ध करुन दिलेला असेल किंवा तयार करण्यात आला असेल.

**२६. अशा वनात मनाई केलेली कृत्ये.-** (१) जर कोणतीही व्यक्ती, -

(ए) कलम ५ अन्वये प्रतिबंधित कोणतीही नविन साफ-सफाई करेल किंवा

(बी) राखीव वनात किंवा प्रस्तावित वनात राखीव वन म्हणून गठित करण्यासंदर्भात राज्य शासनाचा निर्णय जाहीर करणारी कलम ४ खाली अधिसूचना, [ज्या जमिनीच्या संबंधात] निर्गमित झाली असेल त्या जमिनीतील प्रस्तावित वनास आग लावील किंवा राज्य शासनाने याबाबत केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करुन अशा वनात धोका पोहोचेल, अशा रीतीने कोणत्याही प्रकारे विस्तव पेटवील किंवा पेटता राहू देईल, किंवा कोणतीही व्यक्ती राखीव वनात किंवा कलम ४ खाली पूर्वोक्त रीतीने अधिसूचित केलेल्या जमिनीतील प्रस्तावित वनात;

(सी) याबाबतीत वन अधिकारी अधिसूचित करील, अशा हंगामाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे विस्तव पेटवील किंवा ठेवील किंवा विस्तवाची ने-आण करील,

(डी) अपप्रवेश करील किंवा गुरे चारील किंवा गुरास अपप्रवेश करु देईल,

(ई) कोणतेही वृक्ष पाडण्यास किंवा कोणतेही इमारती लाकूड कापण्यास किंवा ओढून नेण्यास हयगय करुन कोणतेही नुकसान करेल,

(एफ) कोणतेही वृक्ष पाडील, त्यात वाटोळे करवे करील, ते छाटील, ते छेदील किंवा ते जाळील, किंवा त्याची साल काढील किंवा पाने तोडील किंवा त्यास इतर रीतीने नुकसान पोहचवील,

(जी) खाणी खणून दगड काढील, किंवा चुन्याची किंवा कोळशाची भट्टी लावील किंवा वन उत्पादन गोळा करील किंवा ते तयार करण्याची कोणतीही प्रक्रिया त्यावर करील किंवा ते काढून नेईल,

(एच) लागवड करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ कोणतीही जमीन साफ करेल किंवा विच्छेदन करील,

(आय) याबाबत राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करुन शिकार करील, बंदुकीने पारध करील, मासेमारी करील, पाण्यात विष टाकील किंवा सापळे किंवा फास लावून ठेवील, किंवा

(जे) ज्या कोणत्याही क्षेत्रात हत्ती संगोपन अधिनियम, १८७९ अंमलात नाही त्या क्षेत्रात अशा रीतीने केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करुन हत्तींना ठार मारील किंवा पकडील,

तर अशी व्यक्ती, त्यास सिध्दापराध ठरविणारे न्यायालय, वनास पोहोचलेल्या नुकसानीबद्दल जी नुकसानभरपाईची रक्कम देण्यास निर्देशित करील, त्या नुकसानभरपाईच्या रकमेव्यतिरिक्त आणखी एक वर्ष मुदतीपर्यंतचा कारावास किंवा पाच हजार रुपये पर्यंतचा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

परंतु, वन अपराध हा सुर्यास्तानंतर व सुर्योदयापुर्वी, किंवा कायदेशीर प्राधिकरणाला प्रतिकार करण्याच्या तयारीनिशी केलेला असेल, किंवा कोणत्याही वन अपराधाकरिता अपराध्याला यापूर्वी सिध्दापराधी ठरविण्यात आले असेल त्या बाबतीत, अशा प्रकरणांमध्ये शिक्षा ही, या पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या शिक्षेच्या दुप्पट इतकी असू शकेल.

(१-ए) (ए) वन अधिका-यास, जी व्यक्ती राखीव वनामध्ये, अपप्रवेश करील किंवा गुराढोरांना चारील, किंवा गुराढोरांना अपप्रवेश करु देईल, किंवा लागवडीसाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ अशा जमिनीची नांगरट करील किंवा झुडुपांची तोड करील अशा कोणत्याही व्यक्तीला अशा राखीव वनामधून किंवा राखीव वनातील कोणत्याही जमिनीवरुन, निष्कासित करता येईल आणि त्यास, अशा जमिनीवर अशा व्यक्तीने उभारलेली कोणतीही इमारत किंवा केलेले बांधकाम पाडून टाकता येईल.

(बी) राखीव वनामधील कोणत्याही जमिनीवरील कृषि किंवा उभी पिके; किंवा कोणत्याही व्यक्तीने तीवर उभारलेली कोणतीही इमारत किंवा केलेले कोणतेही बांधकाम हे, विभागीय वन अधिका-याच्या आदेशाव्दारे सरकारजमा करण्यास पात्र असेल.

(सी) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही शिक्षा दिलेली असली तरी, या पोट-कलमाच्या तरतुदी परिणामकारक असतील :

परंतु, अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अन्वये वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांना प्रदान केलेले वन हक्क आणि पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ अन्वये गौण वन उत्पादनावर असलेला ग्रामसभेचा मालकी हक्क यांवर वरील पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीचा प्रतिकूल परिणाम होणार नाही.

(२) या कलमातील कोणत्याही मजकुरावरुन, -

(ए) वन अधिका-याच्या लेखी परवानगीने किंवा राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमान्वये कोणतेही कृत्य करण्यास; किंवा

(बी) कलम १५ पोट-कलम (२) खंड (सी) अन्वये चालू ठेवलेला किंवा कलम २३ अन्वये शासनाने किंवा शासनाच्या वतीने लेखी दिलेल्या अधिकारपत्रान्वये किंवा केलेल्या करारान्वये निर्माण झालेला कोणताही हक्क उपभोगण्यास मनाई झाली आहे, असे समजले जाणार नाही.

(३) जेव्हा एखाद्या राखीव वनास हेतूपुर:स्सर किंवा अत्यंत हयगय झाल्यामुळे आग लागली असेल, तेव्हा या कलमान्वये कोणतीही शिक्षा ठोठाविण्यात आली असली तरीही राज्य शासन अशा वनात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत गुरे चारण्यासंबंधी किंवा वन उत्पादनासंबंधी असलेले सर्व हक्क उपभोगणे निलंबित करण्याबाबतचे निर्देश देऊ शकेल.

(४) जो कोणीही, पोट-कलम (१-ए) अन्वये लोकसेवकांना अथवा त्यांच्या वतीने कार्य करणा-या कर्मचा-यांना त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यास प्रतिकार करील किंवा त्यापासून परावृत्त करण्यासाठी दुखापत करील अशा कोणत्याही व्यक्तीस, दोष-सिध्द झाल्यावर, एका वर्षापेक्षा कमी नसेल परंतु सहा वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

(५) पोट-कलम (१-ए) व्दारे, तरतूद केलेल्या कोणत्याही प्रकरणात दिवाणी न्यायालयाला कोणतीही अधिकारिता राहणार नाही.

**२७. वन, यापुढे राखीव राहणार नाही, असे जाहीर करण्याची शक्ती.-** (१) राज्य शासन राजपत्रात केलेल्या अधिसूचनेव्दारे असा निर्देश देऊ शकेल की, अशा अधिसूचनेतील निर्धारित तारखेपासून या अधिनियमाखाली राखून ठेवलेले कोणतेही वन किंवा त्याचा कोणताही भाग, राखीव वन म्हणून राहणार नाही.

(२) अशा रीतीने निर्धारित केलेल्या तारखेपासून, असे वन किंवा भाग राखीव म्हणून राहणार नाही, परंतू त्यातील हक्क (जर कोणतेही असतील) नष्ट झाले असतील, तर ते असे वन, राखीव वन म्हणून असल्याचे अशा रीतीने संपुष्टात आल्याचा परिणाम म्हणून पुनर्जीवीत होणार नाही.

## प्रकरण ३

## ग्राम वनांबाबत

**२८. ग्राम वने बनविणे.-** (१) जी कोणतीही जमिन राखीव वन म्हणून गठित झाली असेल किंवा ज्यास संरक्षित वन म्हणून संबोधले जात असेल त्या कोणत्याही जमिनीच्या संबंधातील किंवा त्या जमिनीवरील शासनाचे हक्क, राज्य शासन कोणत्याही ग्रामीण समाजाकडे किंवा *मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही ग्रामपंचायतीकडे, किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदविलेल्या किंवा मानीवरित्या नोंदविण्यात आलेल्या अशा कोणत्याही सहकारी संस्थेकडे अभिहस्तांकित करु शकेल आणि असे अभिहस्तांकन रद्द करु शकेल, अशा रीतीने अभिहस्तांकित करण्यात आलेली सर्व वने ग्रामवने म्हणून संबोधले जातील.

*[सद्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम]

(२) अशा ग्राम वनांचे व्यवस्थापनाचे विनियमन करण्यासाठी आणि ज्या समाजाकडे, पंचायतीकडे किंवा संस्थेकडे अशा प्रकारे हक्क अभिहस्तांकित करुन देण्यात आले असतील त्या समाजास, पंचायतीस किंवा संस्थेस ज्या शर्तीवर इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन किंवा गुरांसाठी कुरणे यांचा पुरवठा करण्यात येईल, त्या शर्ती विहीत करण्यासाठी आणि अशा वनांचे संरक्षण करण्यासंबंधी त्यांची कर्तव्ये विहीत करण्यासाठी राज्य शासन नियमावली तयार करु शकेल.

(३) राखीव किंवा संरक्षित वनासंबंधी या अधिनियमाच्या सर्व तरतुदी (अशा रीतीने केलेल्या नियमाशी ते जेथवर विसंगत नसतील तेथवर), अशा ग्राम वनास हक्क अभिहस्तांकित केलेली वने राखीव वने असतील तर राखीव वनाच्या संबंधातील तरतुदींप्रमाणे किंवा अशी वने, संरक्षित वने असतील तर, संरक्षित वनाच्या संबंधातील तरतुदींप्रमाणे लागू होतील.

## प्रकरण ३ए

## अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउत्पादनासंबंधी

**२८-ए. (१)** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४४ चे खंड (१) नुसार संदर्भीत अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउत्पादनाचे वाहतुकी संबंधी वाहतुक परवाना सुधारित करण्यात येईल आणि योग्य स्तरावर पंचायत आणि ग्रामसभा किंवा त्या संबंधीच्या समितीव्दारे देण्यात येईल.

(२) अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउत्पादनाचे संकलन व विक्री आणि अशा विक्रीतून प्राप्त उत्पन्नाचे हिस्सेवाटपाबाबतचे सर्व निर्णय योग्य स्तरावर पंचायत आणि संबंधित ग्रामसभेव्दारे घेतल्या जातील.

**स्पष्टीकरण** :- प्रकरण ३-ए चे प्रयोजनार्थ

(i) अनुसूचित क्षेत्रातील "गौण वनउत्पादन" याचा अर्थ महाराष्ट्र गौण वनउत्पादनाचे मालकी हस्तांतरण आणि महाराष्ट्र गौण वनउत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ मधे नमूद केल्याप्रमाणेच असेल.

(ii) "ग्राम सभा" याचा अर्थ महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमातील प्रकरण ३-ए मधे नमूद केल्याप्रमाणेच असेल.

## प्रकरण ४
## संरक्षित वनांबाबत

**२९. संरक्षित वने.-** (१) राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेव्दारे, एखाद्या राखीव वनात समाविष्ट नसलेली, परंतू शासनाची मालमत्ता असलेली, किंवा जिच्यावर शासनाचे स्वामित्व अधिकार असतील, अशा वन जमीनीवर किंवा पडीत जमीनीवर किंवा सर्व वन उत्पादनावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर शासनाचा हक्क असेल, अशा कोणत्याही वनउत्पादनावर या प्रकरणातील तरतुदी लागू होतील, असे जाहीर करु शकेल.

(२) अशा कोणत्याही अधिसूचनेत समाविष्ट असलेली वनजमीन व पडीत जमिन "संरक्षित वन" म्हणून संबोधली जाईल.

(३) अशा कोणत्याही अधिसूचनेत समाविष्ट करण्यात आलेल्या वन जमिनीत किंवा पडित जमिनीत किंवा अशा जमिनीवर शासनाचे आणि खाजगी व्यक्तीचे हक्कांचे स्वरुप व व्याप्तीसंदर्भात भूमापनाच्या वेळी किंवा जमाबंदीच्या वेळी किंवा राज्य शासनास पुरेशी वाटत असेल, अशा इतर रीतीने चौकशी झाल्याशिवाय आणि नोंद झाल्याशिवाय अशी अधिसूचना निर्गमित केल्या जाणार नाही. अशी प्रत्येक नोंद, ही तद्‌विरुध्द सिध्द झाल्याशिवाय बिनचूक आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

परंतू असे की, कोणत्याही वनजमीनीच्या किंवा पडित जमिनीच्या बाबतीत अशा प्रकारची चौकशी व नोंद करणे आवश्यक तर आहे, परंतू अशी चौकशी व नोंद करण्यास इतका दीर्घ कालावधी लागेल की त्या कालावधीच्या दरम्यान शासनाच्या हक्कांना धोका निर्माण होईल, असे राज्य शासनास वाटत असेल तर, अशा प्रकारची चौकशी व नोंद होई पर्यंत ती जमिन संरक्षित वन आहे, राज्य शासन असे जाहीर करु शकेल. परंतु, त्यामुळे अशा व्यक्तींचे किंवा समाजाचे कोणतेही विद्यमान हक्क बाधित किंवा प्रभावित होणार नाही.

**३०. वृक्ष, इत्यादी राखून ठेवण्याबाबत अधिसूचना निर्गमित करण्याची शक्ती.-** राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेव्दारे, -

(ए) एखाद्या संरक्षित वनातील कोणतेही वृक्ष किंवा कोणत्याही वर्गाचे वृक्ष, त्या अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या तारखेपासून राखीव ठेवण्यात आले आहे, असे जाहीर करु शकेल;

(बी) अशा वनाचा उक्त अधिसूचनेत निर्दिष्ट केलेला कोणताही भाग, तीस वर्षाहून अधिक होणार नाही, अशी जी मुदत राज्य शासनास योग्य वाटेल, त्या मुदतीपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे, आणि अशा भागावर कोणत्याही व्यक्तीचे, जे कोणतेही वैयक्तिक हक्क असतील, ते अशा मुदतीपर्यंत निलंबित ठेवण्यात आले आहेत, असे जाहीर करु शकेल, मात्र अशा वनाचा शिल्लक राहिलेला भाग, हा अशा रीतीने हक्कांचे वाजवी उपभोगासाठी पुरेसा असेल व तो वाजवीरीत्या सोईस्कर अशा ठिकाणी असेल; किंवा

(सी) उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेल्या तारखेपासून अशा कोणत्याही वनात खाणी खणून दगड काढण्यास किंवा चुन्याची किंवा कोळशाची भट्टी लावण्यास किंवा अशा वनातील कोणतेही वन उत्पादन गोळा करण्यास किंवा ते तयार करण्याची कोणतीही क्रिया त्यावर करण्यास किंवा ते काढून नेण्यास अशा कोणत्याही वनातील कोणतीही जमिन लागवड करण्यासाठी, इमारती बांधण्यासाठी, गुरांचे कळप ठेवण्यासाठी किंवा कोणत्याही इतर प्रयोजनासाठी विच्छेदन करण्यास किंवा ती जमिन झाडे तोडून साफ करण्यास मनाई करु शकेल.

**३१. अशा अधिसूचनेचा अनुवाद, शेजारच्या परिसरात प्रसिध्द करणे.-** जिल्हाधिकारी हा, कलम ३० खाली निर्गमित प्रत्येक अधिसूचनेचा स्थानिक देशी भाषेतील अनुवाद, त्या अधिसूचनेत समाविष्ट करण्यात आलेल्या वनाच्या शेजारी असलेल्या प्रत्येक शहरातील व गावातील एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करेल.

**३२. संरक्षित वनासाठी नियम करण्याची शक्ती.-** राज्य शासन पुढील विषयांचे विनियमन करण्यासाठी नियमावली तयार करु शकेल, त्या गोष्टी अशा :-

(ए) संरक्षित वनातील वृक्ष व इमारती लाकडे तोडणे, करवतीने कापणे, ती घडविणे व ती अशा वनाबाहेर नेणे आणि वन-उत्पादन गोळा करणे, तयार करणे व ते संरक्षित वनाबाहेर काढून नेणे;

(बी) संरक्षित वनाच्या जवळपास असलेल्या शहरात आणि गावात राहणा-या व्यक्तींना आपल्या स्वत:च्या उपयोगासाठी वृक्ष किंवा इमारती लाकडे किंवा इतर वन-उत्पादन घेता यावे, म्हणून परवाने देणे आणि अशा व्यक्तींनी असे परवाने हजर करणे व परत करणे;

(सी) व्यापाराच्या प्रयोजनार्थ अशा वनातील वृक्ष किंवा इमारती लाकडे पाडण्याचे किंवा ती अशा वनाबाहेर काढून नेण्याचे किंवा वनापासून मिळणारे इतर वन-उत्पादन अशा वनाबाहेर काढून नेण्याचे काम करणा-या व्यक्तींना परवाने देणे आणि अशा व्यक्तींनी असे परवाने हजर करणे व परत करणे;

(डी) अशी वृक्ष कापण्यासाठी किंवा अशी इमारती लाकडे किंवा असे इतर वन उत्पादन गोळा करण्यासाठी व ती काढून नेण्यासाठी दिलेल्या परवानगीबद्दल खंड (बी) आणि (सी) मध्ये विनिर्दिष्ट व्यक्तींव्दारे प्रदाने, असतील तर, अदा करणे;

(ई) त्यांनी अशा वृक्षांबाबत, इमारती लाकडाबाबत व अशा उत्पादनाबाबत इतर कोणतेही प्रदाने अदा करावयाचे असल्यास ती प्रदाने, आणि अशी प्रदाने ज्या ठिकाणी अदा करावयाची आहेत, ती ठिकाणे;

(एफ) अशा वनाच्या बाहेर नेण्यात येणा-या वन-उत्पादनाची तपासणी करणे;

(जी) लागवड करण्यासाठी किंवा इतर प्रयोजनार्थ अशा वनातील जमीन साफ करणे व तिचे विच्छेदन करणे;

(एच) अशा वनात पडून असलेल्या इमारती लाकडाचे व कलम ३० खाली राखून ठेवण्यात आलेल्या वृक्षांचे आगीपासून संरक्षण करणे;

(आय) अशा वनात गवत कापणे व गुरे चारणे;

(जे) अशा वनात शिकार करणे, बंदुकीने पारध करणे, मासेमारी करणे, पाण्यात विष टाकणे व सापळे किंवा फास लावून ठेवणे, आणि अशा वनातील ज्या क्षेत्रात हत्ती संगोपन अधिनियम, १८७९ अंमलात नसेल, त्या क्षेत्रात हत्तींना ठार मारणे किंवा त्यांना पकडणे;

(के) कलम ३० अन्वये बंद करण्यात आलेल्या वनाच्या कोणत्याही भागाचे संरक्षण करणे व त्याची व्यवस्था ठेवणे; आणि

(एल) कलम २९ मध्ये उल्लेखित हक्कांचे उपभोग करणे.

**३३. कलम ३० अन्वये निर्गमित अधिसूचनेचे किंवा कलम ३२ अन्वये केलेल्या नियमांचे उल्लंघन करुन केलेल्या कृत्याबद्दल शास्ती.-** (१) जी कोणीही व्यक्ती पुढील अपराधांपैकी कोणताही अपराध करील, म्हणजे-

(ए) कलम ३० खाली राखून ठेवलेले कोणतेही वृक्ष पाडील, त्यात वाटोळे करवे करील, ते छाटील, ते छेदील किंवा ते जाळील अथवा अशा कोणत्याही झाडाची साल काढील किंवा पाने तोडील किंवा अन्यथा त्यास नुकसान पोहचवील;

(बी) कलम ३० खाली केलेल्या मनाईविरुध्द खाणी खणून कोणताही दगड काढील किंवा चुन्याची किंवा कोळशाची भट्टी लावील किंवा कोणतेही वनउत्पादन गोळा करील, किंवा ते तयार करण्याची कोणतीही क्रिया त्यावर करील किंवा ते काढून नेईल;

(सी) कलम ३० खाली केलेल्या मनाईविरुध्द कोणत्याही संरक्षित वनातील कोणतीही जमीन, लागवड करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी विच्छेदित करील किंवा साफ करील;

(डी) अशा वनात आग लावील किंवा कलम ३० अन्वये राखून ठेवलेल्या कोणत्याही वृक्षास, मग ती उभी असोत किंवा पाडलेली असोत किंवा अशा वनाच्या कोणत्याही बंद केलेल्या भागास आग लागू नये म्हणून सर्व वाजवी सावधगिरीच्या उपाययोजना केल्यावाचून विस्तव पेटवील;

(ई) अशा कोणत्याही वृक्षाच्या किंवा बंद केलेल्या भागाच्या जवळपास त्याने पेटविलेला कोणताही विस्तव ठेऊन जाईल;

(एफ) उपरोक्त रीतीने राखून ठेवलेल्या कोणत्याही वृक्षास नुकसान पोहोचेल, अशा रीतीने कोणतेही वृक्ष पाडील किंवा कोणतीही इमारती लाकडे ओढून नेईल;

(जी) गुरांस अशा कोणत्याही वृक्षाचे नुकसान करु देईल;

(एच) कलम ३२ खाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करील;

ती व्यक्ती, एक वर्ष मुदतीपर्यंतचा कारावास किंवा पाच हजार रुपये पर्यंतचा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

(२) जेव्हा एखाद्या संरक्षित वनास हेतुपुरस्सर आग लावली असेल किंवा अत्यंत हयगय केल्यामुळे आग लागली असेल तेव्हा, या कलमाखाली कोणतीही शास्ती करण्यात आली असली तरीही, राज्य शासन त्या वनात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत गुरे चारण्यासंबंधी किंवा वन उत्पादनासंबंधी असलेला कोणताही हक्क उपभोगण्याचे निलंबित ठेऊ शकण्याबाबत निर्देश देऊ शकेल.

(३) जेव्हा एखाद्या व्यक्तीस पोट-कलम (१) खालील एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल तेव्हा,

(ए) क्षेत्रपालाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या वन अधिका-यास; किंवा

(बी) उप-निरिक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिका-यास; किंवा

(सी) महालकरी किंवा तहसिलदाराच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिका-यास, ज्या संरक्षित वनाच्या संबंधात अशा व्यक्तीने असा अपराध केला असेल त्या वनातून त्या व्यक्तीला निष्कासित करता येईल. (क्षेत्रपाल = रेंजर)

**३४. या प्रकरणातील कोणत्याही तरतुदींमुळे विवक्षित बाबतीत केलेल्या कृत्यास मनाई असणार नाही.-** वन अधिका-याच्या लेखी परवानगीने, किंवा कलम ३२ खाली केलेल्या नियमांना अनुसरुन कोणतेही कृत्य करण्यास, किंवा कलम ३० खाली बंद करण्यात आलेल्या वनाचा भाग वगळून, किंवा जे कोणतेही हक्क उपभोगण्याचे कलम ३३ खाली निलंबित ठेवण्यात आले असतील, ते हक्क उपभोगण्याच्या खेरीज करुन, कलम २९ खाली नोंद केलेले कोणतेही हक्क उपभोगण्यास्तव करण्यात आलेले कोणतेही कृत्य करण्यास, या प्रकरणातील कोणतीही तरतूद प्रतिबंध करीत आहे, असे मानण्यात येणार नाही.

## प्रकरण ५
## शासनाची मालमत्ता नसलेली वने व जमीनीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**३४ए. अर्थविवरण.-** या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी 'वन' या संज्ञेत, झाडे व झुडपे असलेली कोणतीही जमीन, कुरणाची जमीन आणि राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेद्वारे वन म्हणून जाहीर करील, अशी कोणत्याही प्रकारची जमीन याचा समावेश होतो.

**३५. विशिष्ट कारणासाठी वनाचे संरक्षण करणे.-** (१) राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेद्वारे.

(i) कोणत्याही वनात खालील बाबींचे विनियमन किंवा प्रतिबंध करु शकेल -

(ए) शेतीसाठी जमीनीचे विच्छेदन किंवा वृक्ष तोडून साफ करणे;

(बी) गुरे चारणे;

(सी) झाडे-झुडपे जाळणे किंवा काढून टाकणे;

(डी) कोणत्याही वृक्षास वाटोळे करवे करणे, छेदणे, जाळणे किंवा कोणत्याही वृक्षाची साल काढणे किंवा पाने तोडणे;

(ई) वृक्ष छाटणे किंवा त्यांचे शेंडे कापणे;

(एफ) वृक्ष व इमारती लाकडे कापणे, त्याचे करवतीने तुकडे करणे, ती घडविणे किंवा ती काढून नेणे; किंवा

(जी) खाणी खणून दगड काढणे किंवा चुन्याची अथवा कोळशाची भट्टी लावणे किंवा कोणतेही वन उत्पादन गोळा करणे किंवा ते काढून नेणे किंवा ते तयार करण्याची कोणतीही प्रक्रिया त्यावर करणे.

(ii) कोणत्याही वनात, वनाची पुर्ननिर्मिती व त्याचे आगीपासून संरक्षण करण्यासाठी विनियमन करणे; जेव्हा सदर विनियमन किंवा प्रतिबंध खालील पैकी कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक वाटत असेल:-

(ए) वृक्ष व वने याचे संवर्धन करण्यासाठी;

(बी) मातीचे परिरक्षण आणि तिची सुधारणा करण्यासाठी, किंवा खारवट अथवा पाणथळ जमीन पुन:स्थापित करण्यासाठी किंवा जमीनीचे विस्खलन होऊ नये किंवा खोल अरुंद द-या होऊ नये अथवा पाण्याचे खोल ओहोळ आणि लोट निर्माण होऊ नयेत किंवा जमीनीची धूप होण्यापासून किंवा तिच्यावर वाळू, दगड किंवा कंकर याचा थर जमा होण्यापासुन तिचे संरक्षण करण्यासाठी;

(सी) चराईमधील सुधारणा करण्यासाठी;

(डी) झ-यात, नद्यात व तळयात पाण्याच्या पुरवठयाची देखभाल करण्यासाठी;

(ई) वैरण, पानापासून तयार होणारे खत, इमारती लाकूड किंवा जळण यांची देखभाल करणे आणि वाढ करणे, पुरवठा कायम राखण्यासाठी व त्याचे वाटप करण्यासाठी;

(एफ) पाण्याचे साठे किंवा पाटबंधा-याची कामे आणि जलविद्युत कामे सुस्थितीत राखण्यासाठी;
(जी) वादळ, वारा, गडगडत येणारे दगड, पूर व अवर्षण या पासून संरक्षण करण्यासाठी;
(एच) रस्ते, पूल, रेलमार्ग आणि दळणवळणाचे इतर मार्ग याचे संरक्षण करण्यासाठी; आणि-
(आय) सार्वजनिक आरोग्याचे परिरक्षण करण्यासाठी---

(२) अशा कोणत्याही प्रयोजनासाठी राज्य शासन स्वत:च्या खर्चाने कोणत्याही वनात योग्य वाटेल, असे कोणतेही बांधकाम उभारु शकेल.

(३) राज्य शासनाकडून त्यासंदर्भात प्राधिकृत केलेल्या अधिका-याने अशा वनाचे मालकास अशी अधिसूचना का निर्गमित करण्यात येऊ नये, किंवा यथास्थितीत बांधकाम का उभारण्यात येऊ नये, याबाबत नोटीस जारी करुन उक्त नोटीसीत निर्दिष्ट वाजवी मुदतीच्या आत कारणे दर्शविण्याबद्दल निर्देश दिल्याशिवाय आणि त्याप्रयोजनार्थ रितसर नेमण्यात आलेले अधिका-याकडून त्या व्यक्तीला असलेल्या हरकतीबाबत सादर करण्यात आलेल्या पुराव्यासंदर्भात सुनावणी झाल्याशिवाय आणि राज्य शासनाकडून त्याचा विचार झाल्याशिवाय पोट कलम (१) खाली कोणतीही अधिसूचना केली जाणार नाही किंवा पोट कलम (२) खाली कोणतेही बांधकाम सुरु केले जाणार नाही.

(४) पोट कलम (१) अन्वये अधिसूचना का काढण्यात येऊ नये, या बद्दल कारण दर्शविण्यास ज्या नोटीसीद्वारे निर्देश देण्यात आले असेल त्याच नोटीसीद्वारे असेही दर्शविता येईल की, एक वर्षाहून अधिक नसेल, अशी कोणतीही मुदत किंवा अधिसूचना काढण्यात येईल, त्या तारखेपर्यंत होणारी मुदत, या दोन्हीपैकी जी अगोदरची असेल, त्या मुदतीत अशा वनाच्या मालकाने किंवा अशा वनात ज्यास कोणत्याही हक्कामुळे किंवा स्वामित्व अधिकारामुळे किंवा कोणत्याही हितसंबंधामुळे किंवा कोणत्याही परवाना अन्वये किंवा करारान्वये किंवा अन्य रितीने पोट कलम (१) चे खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टीपैकी कोणतीही गोष्ट किंवा सर्व गोष्टी करण्याचा हक्क असेल किंवा त्या गोष्टी करण्याची परवानगी मिळालेली असेल, अशा सर्व व्यक्तीस नोटीसीच्या तारखेनंतर आणि यथास्थिती उपरोल्लेखित मुदतील किंवा उपरोल्लेखित तारखेपर्यंत तसेच उक्त नोटीसीत निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत पोट कलम (१) चे खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टीपैकी कोणतीही गोष्ट किंवा त्या सर्व गोष्टी करता येणार नाहीत.

(५) पोट कलम (३) खाली निर्गमित नोटीस, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ यात आज्ञापत्र बजावण्यासाठी ज्या रितीची तरतूद करण्यात आलेली आहे, त्याच रितीने अशा वनाच्या मालकावर बजावण्यात येईल आणि ती नियमान्वये विहित केलेल्या रितीने प्रसिध्द करण्यात येईल.

(५-ए) जेव्हा पोट कलम (३) खाली निर्गमित नोटीस, पोट कलम (५) अनुसार वनाच्या मालकावर बजावण्यात आली असेल तेव्हा ज्या कोणत्याही व्यक्तीने त्या वनाचा स्वामित्वाधिकार तद्नंतर संपादन

केला असेल त्या कोणत्याही व्यक्तीवर, अशी नोटीस जणू ती अशा वनाचा मालक म्हणून त्याच्यावर बजावण्यात आली होती असे समजून, बंधनकारक असेल आणि तदनुसार तो त्या कलमान्वये निर्गमित केलेल्या कोणत्याही नोटीशीचे, दिलेल्या आदेशाचे व काढलेल्या अधिसूचनेचे पालन करेल,

(६) पोट कलम (१) अन्वये अधिसूचना का काढण्यात येऊ नये, या बद्दल कारण दर्शविण्यास ज्या नोटीशीद्वारे निर्देशित केले असेल त्याच नोटीशीवरुन पोट कलम (४) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लघंन करणा-या कोणत्याही व्यक्तीस, त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर सहा महिने मुदतीपर्यंत कारावास किंवा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(७) पोट कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्तीस, दोषी ठरविण्यात आल्यावर सहा महिने मुदतीपर्यंत कारावास किंवा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**३६. वनाचे व्यवस्थापन (स्वत:कडे) घेण्याची शक्ती.-** (१) कलम-३५ अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमनाचे किंवा तद्न्वये केलेल्या प्रतिबंधाचे पालन करण्यात हयगय केल्याच्या बाबतीत किंवा असे विनियमन किंवा असा प्रतिबंध याचे हेतू:पुरस्सर उल्लघंन करण्यात आल्याच्या बाबतीत किंवा ज्या प्रयोजनासाठी या कलमान्वये कोणतेही बांधकाम उभारावयाचे असेल त्या प्रयोजनाकरीता तसे करणे आवश्यक असेल तर, अशा बाबतीत राज्य शासनास अशा वनाच्या मालकास लेखी नोटीस दिल्यानंतर व त्याच्या कोणत्याही हरकती असल्यास, त्याचा विचार केल्यानंतर ते वन अधिका-यांच्या नियंत्रणाखाली ठेवता येईल आणि अशा वनास राखीव किंवा संरक्षित वनांसंबंधी या अधिनियमाचे सर्व किंवा कोणत्याही तरतुदी लागू होतील असे जाहीर करता येईल.

(२) अशा वनाच्या व्यवस्थापनेपासून कोणताही निव्वळ नफा झाल्यास तो उक्त मालकास अदा करण्यात येईल,

**३६ए. कलम ३६ अन्वये नोटीस आणि आदेश बजाविण्याची रीत.-** कलम ३६ पोट कलम (१) यात उल्लेखिलेली नोटीस आणि एखादे वन, वन अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देण्याविषयी कोणताही आदेश दिला असल्यास असा आदेश हा दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ यात आज्ञापत्र बजावण्यासाठी केलेल्या रितीने अशा वनाच्या मालकावर बजावण्यात येतील.

**३६बी. नियंत्रणाची मुदत.-** (१) कोणतेही वन अशा रितीने नियंत्रणाखाली ठेवण्याची मुदत उपरोक्त आदेशाच्या तारखेपासून दहा वर्षाची असेल परंतू त्यांनतर अशी मुदत प्रत्येकी दहा वर्षाहून अधिक नाही, इतक्या लागोपाठ मुदतीसाठी वाढविता येईल. परंतू अशा नियंत्रणाची मुदत, अशा आदेशाच्या तारखेपासून एकूण ३० वर्षाहून अधिक राहणार नाही.

(२) ज्या वनाधिका-यांच्या नियंत्रणाखाली असे वन ठेवण्यात आले असेल तो वन अधिकारी पोट कलम-१ मध्ये उल्लेखिलेली कोणतीही मुदत संपण्यापूर्वी सहा महिन्याहून अधिक उशिर होणार नाही अशा बेताने अशा नियंत्रणाच्या संबंधात एक प्रतिवृत्त सादर करील आणि त्यात नियंत्रणाची मुदत वाढवावी किंवा कसे ही गोष्ट नमूद करील.

(३) अशा कोणत्याही प्रतिवृत्ताचा विचार केल्यानंतर व पोट कलम (१) याच्या तरतुदींच्या आधिन राहून राज्य शासन अशा नियंत्रणाच्या मुदतीत वाढ करावी किंवा कसे, किंवा ही लगत नंतरच्या कलमात तरतूद केलेल्या रितीने संपवावी किंवा कसे, हे ठरवील.

(४) नियंत्रणाची कोणतीही मुदत, ती अशा रितीने का वाढविण्यात येवू नये, याबद्दल कारण दर्शविण्याची मालकास वाजवी संधी दिल्या वाचून वाढविण्यात येणार नाही.

**३६सी. नियंत्रण रद्द करणे.-** (१) जेव्हा कोणत्याही वनाच्या नियंत्रणाची कोणतीही मुदत संपविण्यात यावी, असे राज्य शासन ठरविल तेव्हा तो, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे आणि नियमान्वये विहित केलेल्या इतर रितीने तसे जाहीर करेल; आणि त्यांनतर अशा वनाचा ताबा मालकास किंवा मालक मृत्यू पावला असेल तर, असा ताबा मिळविण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस देण्यात येईल आणि त्याच बरोबर अशा मालकाच्या नावे जी कोणतीही रक्कम जमा झाली असेल ती रककम सुध्दा, अशा मालकास किंवा त्या व्यक्तीस देण्यात येईल.

(२) ज्या मुदतीत कोणतेही वन, वन-अधिका-यांच्या नियंत्रणाखाली असेल, त्या मुदतीत किंवा तीत वाढ केलेल्या मुदतीत वन अधिका-याने त्याच्या नियंत्रणाखाली ठेवलेल्या कोणत्याही वनाच्या संबंधात केलेली किंवा जी केली आहे असे अभिप्रेत असेल, अशी सर्व कृत्ये, अशा वनाच्या मालकावर किंवा या कलमान्वये ज्या कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात असे वन देण्यात आले असेल त्या व्यक्तीवर बंधनकारक असतील.

**३७. विशिष्ट बाबतीत वनाची मालकी काढून घेणे.-** (१) या प्रकरणात येणा-या कोणत्याही बाबतीत राज्य शासनास असे वाटत असेल की, असे वन, वन-अधिका-यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्याऐवजी ते वन सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्यात यावे तर, अशा बाबतीत राज्य शासन त्यास भूमि संपादन अधिनियम, १८९४ यात तरतूद केलेल्या रितीने पुढे काम सुरु करेल.

टिप :- (१) महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या कलम २९(१) अनुसार कलम ३४ए, ३५, ३६, ३६ए, ३६बी, ३६सी आणि ३७ निरस्त करण्यात आले.

(२) परंतु ज्या तारखेपासून महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) (सुधारणा) अधिनियम, १९७८ लागू झाला तेव्हापासून, त्यातील कलम २४(१) मधे काहीही अंतर्भूत असले तरी जी जमीन त्या अधिनियमाच्या कलम २२ए खाली संपादीत करण्यात आली त्याबाबत उक्त कलमे अशा संपादीत केलेल्या जमीनीकरीता ती कलमे निरस्त झाली नाहीत आणि जणू पुन्हा अधिनियमीत केली आहे असे गृहीत धरण्यात येईल.

**३८. मालकाच्या विनंती वरुन वनाचे संरक्षण करणे.-** (१) कोणत्याही जमिनीच्या मालकास किंवा तीचे एकाहून अधिक मालक असतील तर, ज्यांचे अशा जमिनीत कमीत कमी दोन तृतियांशाइतके एकूण हिस्से असतील, अशा या जमिनीच्या मालकांना, त्या जमिनीवर वने तयार करण्याच्या किंवा तीजवरील वनाचे जतन करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिका-याकडे एक लेखी विनंती अर्ज सादर करता येईल व त्याद्वारे;-

(ए) त्यांच्या वतीने अशा जमिनीची व्यवस्था राखीव किंवा संरक्षित वने म्हणून परस्पर ठरविण्यात येतील, अशा शर्तीवर वन अधिका-यांने करावी किंवा;

(बी) या अधिनियमाच्या तरतुदीपैकी सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अशा जमिनीस लागू करण्यात यावे; अशी आपली इच्छा असल्याबद्दल जिल्हाधिका-यास कळविता येईल.

(२) अशा प्रत्येक बाबतीत राज्य शासनास, त्यास त्या जमिनीच्या संबंधातील परिस्थिती अनुसार या अधिनियमाच्या ज्या तरतुदी अशा जमिनीस लागू करणे त्यास योग्य वाटेल व जे लागू करण्याची अर्जदाराची इच्छा असेल त्या तरतुदी त्यास राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे त्या जमिनीस लागू करता येतील.

## प्रकरण ६

## इमारती लाकडे व इतर वन उत्पादन यावर आकारावयाच्या शुल्काबाबत

**३९. इमारती लाकूड आणि इतर वन उत्पादन यावर शुल्क आकारण्याची शक्ती.-** (१)केंद्रशासन पुढील प्रकारच्या सर्व इमारती लाकडावर किंवा इतर सर्व वन उत्पादनावर राजपत्राव्दारे अधिसूचनेत घोषित करील, त्या रीतीने त्या ठिकाणी व त्या दरांनी शुल्क आकारु शकेल.

(ए) जी, हा अधिनियम लागू असलेल्या प्रदेशात उत्पन्न झाली आहेत व ज्यावर शासनाचा कोणताही हक्क असेल,

(बी) जी, हा अधिनियम लागू असलेल्या प्रदेशाबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून आणली असतील,

(२) जर असे शुल्क मूल्यवर्धितरित्या (ad-valorem) आकारणे निर्देशित असतील, तर अशा प्रत्येक प्रकरणी केंद्र शासन अशाच प्रकारचे अधिसूचनेव्दारे ज्यावर असे शुल्क आकारले आहे, असे मूल्य निर्धारित करु शकेल.

(३) हा अधिनियम कोणत्याही प्रदेशात ज्यावेळी अंमलात येईल, त्यावेळी त्या प्रदेशात इमारती लाकडावर व इतर वन उत्पादनावर जे शुल्क राज्य शासनाच्या प्राधिकाराखाली आकारण्यात येत असेल ते सर्व या अधिनियमाच्या तरतुदींन्वये योग्य रीतीने आकारण्यात आले आहे आणि ते योग्य रीतीने आकारण्यात आले होते, असे मानण्यात येईल

(४) या कलमात काहीही असले तरी, संसदेकडून तद्विरुध्द तरतूद करण्यात येईपर्यंत संविधान अंमलात येण्यापूर्वी अंमलात असलेले जे शुल्क राज्य शासन कायदेशीररित्या आकारत होते ते शुल्क आकारणे चालू ठेवू शकेल.

परंतु असे की, राज्यातील इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन तसेच राज्याबाहेर असलेल्या ठिकाणाहून मिळणारे तत्सम उत्पादन या दोन्हीमध्ये फरक करुन प्रथम निर्दिष्ट केलेल्या उत्पादनास अनुकूल होईल, अशा रीतीने त्यावर निरनिराळया दराने कोणतेही कर आकारण्याचा किंवा इतर वन उत्पादनाच्या बाबतीत एका ठिकाणाहून मिळणारे इमारती लाकूड किंवा इतर वनउत्पादन आणि तसेच दुस-या ठिकाणाहून मिळणारे त्याचप्रकारचे इमारती लाकूड किंवा इतर वनउत्पादन या दोन्हीमध्ये फरक करुन त्यावर निरनिराळया दराने कोणतेही कर आकारण्याचा या पोट कलमातील कोणत्याही तरतुदींवरुन प्राधिकार मिळणार नाही.

**४०. खरेदी रकमेवर किंवा स्वामित्व रकमेवर मर्यादा लागू राहणार नाही.-** कोणत्याही इमारती लाकडावर किंवा इतर वन उत्पादनावर खरेदी किंमत म्हणून किंवा स्वामित्व शुल्क म्हणून आकारीय रक्कम, जरी ती अशा इमारती लाकूड किंवा अन्य उत्पादनावर वाहतूकीच्या दरम्यान ज्यारितीने शुल्क आकारले जातात, त्यारितीने वसूल झाले असतील तरीही या प्रकरणातील कोणतीही गोष्ट त्यास मर्यादित ठरते, असे मानले जाणार नाही.

## प्रकरण ७

## वाहतुक होत असतांना इमारती लाकडे आणि इतर वनउत्पादनावर नियंत्रण ठेवण्याबाबत.

**४१. वनउत्पादनाची वाहतूक करण्याचे विनियमन करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.-** (१) इमारती लाकडे पाण्याच्या प्रवाहात वाहत नेऊन त्यांची वाहतूक करण्याच्या संबंधात सर्व नद्यांवर व त्यांच्या काठावर नियंत्रण ठेवण्याची आणि इमारती लाकडे व इतर वन उत्पादन यांची जमिनीवरुन किंवा

जलमार्गाने वाहतूक होत असतांना त्या सर्व इमारती लाकडावर व त्या सर्व प्रकारच्या वन उत्पादनावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती राज्य शासनाकडे निहित राहील आणि अशा सर्व इमारती लाकडांची व इतर वन उत्पादनाची वाहतूक करण्याचे विनियमन करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील.

(१-ए) अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही राज्य शासन वनसीमेत किंवा वनसीमेपासून ऐंशी किलोमीटर पेक्षा अधिक नाही, अशा मर्यादेत विनियमन करण्यासाठी तसेच आरागिरणीकरीता अनुज्ञप्ती देण्यासाठी व अशा आरागिरणीत इमारती लाकूड कापण्यासाठी किंवा अन्य प्रकारे रुपांतरित करण्यासाठी अनुज्ञप्ती शुल्क व आरागिरणी संदर्भात अटी व अनुज्ञप्ती कोणत्या अटींवर दिली जाईल, अशा अटीबाबत तसेच अशी अनुज्ञप्ती नाकारण्याबाबत, निलंबित करण्याबाबत किंवा परत घेण्याबाबत कोणत्या प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल, याबाबत नियमावली करु शकेल.

(२) विशेषत: आणि उपरोक्त शक्तीच्या सामान्यतेस बाधा येऊन देता, अशा नियमावली नुसार -

(ए) इमारती लाकूड किंवा इतर वन उत्पादन ही केवळ ज्या मार्गानी राज्यात आयात करता येतील किंवा राज्याच्या बाहेर निर्यात करता येतील किंवा ती केवळ ज्या मार्गानी राज्याच्या आत एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेता येईल, ते मार्ग विहित करु शकेल;

(बी) असा परवाना देण्यासाठी ज्यास योग्य रीतीने प्राधिकृत करण्यात आले असेल, अशा अधिका-याकडून परवाना प्राप्त केल्यावाचून किंवा अशा परवानाच्या शर्तीस अनुसरुन असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने अशी इमारती लाकडे किंवा असे इतर वन उत्पादन आयात करण्यास, निर्यात करण्यास किंवा ती एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेण्यास प्रतिबंधित करु शकेल;

(सी) असे परवाना देणे, हजर करणे व परत करणे आणि त्याबद्दल शुल्क आकारण्याविषयी तरतूद करु शकेल;

(डी) कोणतीही इमारती लाकडे किंवा कोणतेही इतर वन उत्पादन त्यांच्या किमतीबद्दल अथवा त्यावरील येणे असलेले कोणतेही शुल्क, फी, स्वामित्व रक्कम अथवा आकार याबद्दल कोणतीही रक्कम शासनास देय आहे, असे समजण्यास कारण असेल तर तशी इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन अथवा ज्यास या अधिनियमाच्या कारणासाठी चिन्हांकित करणे योग्य असेल, ते इमारती लाकूड अथवा वन उत्पादन यांची ने-आण होत असतांना मार्गात थांबून धरणे, त्याविषयी प्रतिवृत्त सादर करणे, त्यांची तपासणी करणे आणि ती चिन्हांकित करण्याची तरतूद करु शकेल;

(इ) अशी इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन यांची तपासणी करण्यासाठी किंवा त्यांच्या बाबतीत अशी रक्कम भरण्यात यावी म्हणून किंवा अशा प्रकारे ती चिन्हांकित करता येतील म्हणून ती इमारती लाकडे व ते वन उत्पादन ज्यांच्या स्वाधीन असेल, त्या व्यक्तीने ती लाकडे किंवा ते उत्पादन

ज्या आगारात नेले पाहीजे, त्या आगाराची स्थापना करणे व त्यांचे विनियमन करणे आणि ज्या शर्तीखाली अशी इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन अशा आगारात नेण्यात येईल, तेथे साठविण्यात येईल व तेथून हलविली जाईल, त्या शर्ती ठरवू शकेल;

(एफ) इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन यांची ने-आण करण्यासाठी ज्या कोणत्याही नदीचा उपयोग करण्यात येत असेल त्या नदीचा प्रवाह किंवा काठ बंद करण्यास किंवा त्यास अडथळा करण्यास आणि अशा कोणत्याही नदीत गवत झुडपे डाहाळया व पाने टाकण्यास किंवा ज्या कोणत्याही कृत्याने अशी नदी बंद होईल किंवा तीस अडथळा निर्माण होईल, ते कृत्य प्रतिबंधीत करु शकेल;

(जी) अशा कोणत्याही नदीच्या प्रवाहास किंवा काठास झालेला कोणताही अडथळा रोखणे आणि काढून टाकण्यास तरतुद करु शकेल आणि ज्याच्या कृत्यामुळे तसे करणे आवश्यक झाले आहे अशा व्यक्तीकडून तो खर्च वसूल करण्याबद्दल तरतूद करु शकेल;

(एच) निर्दिष्ट केलेल्या स्थानिक हद्दीच्या आत इमारती लाकडे करवतीने कापण्यासाठी खड्डे करण्यास व अशी लाकडे घडविण्यास, कापण्यास, जाळण्यास, लपविण्यास किंवा ती चिन्हांकित करण्यास किंवा अशा इमारती लाकडावरील कोणत्याही चिन्हात फेरफार करण्यास किंवा ती चिन्हांकित करण्यासाठी ज्यांचा उपयोग करण्यात येतो असे चिन्ह करण्याचे हातोडे किंवा इतर औजारे (implements) जवळ बाळगण्यास किंवा बरोबर नेण्यास पूर्णपणे किंवा काही शर्तींना अधीन ठेवून प्रतिबंधित करु शकेल;

(आय) इमारती लाकडासाठी स्वामित्व चिन्हांचा उपयोग करण्याचे व अशा प्रकारच्या चिन्हांची नोंदणी ज्या मुदतीपर्यंत अंमलात राहील, ती मुदत विहित करणे, कोणत्याही एका ईसमास ज्या संख्येइतकी चिन्हे नोंदविता येतील, ती संख्या ठरविणे, आणि अशा रीतीने नोंदणी करण्याबद्दल शुल्क आकारण्याची तरतूद करु शकेल;

३) या कलमान्वये केलेला कोणताही नियम विशिष्ट वर्गाच्या इमारती लाकडास किंवा विशिष्ट वर्गाच्या इतर वन उत्पादनास किंवा कोणत्याही विशिष्ट स्थानिक क्षेत्रास लागू होणार नाही, राज्य शासन असा निर्देश देऊ शकेल.

**४१-ए. इमारती लाकडाची कस्टम सिमान्तापलीकडे वाहतूक करण्याच्या संबंधात केंद्रशासनाची शक्ती.-** कलम ४१ यात काहीही असले तरी हा अधिनियम ज्यास लागू आहे, अशा प्रदेशाच्या आत किंवा अशा प्रदेशाबाहेर इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन यांची केवळ ज्या मार्गाने केंद्रशासनाने व्याख्या करुन ठरवून दिलेले कोणतेही शुल्क सिमान्त ओलांडून आयात करता येईल किंवा निर्यात करता येईल किंवा त्यांची एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी ने-आण करता येईल, तो मार्ग विहित करुन देण्यासाठी

केंद्रशासन नियम तयार करु शकेल आणि या कलमान्वये केलेल्या नियमांना अधीन राहून कलम ४१ अन्वये केलेले कोणतेही नियम परिणामक्षम होतील.

**४२. कलम ४१ अन्वये केलेल्या नियमांचा भंग केल्याबद्दल शिक्षा.-** (१) अशा नियमांव्दारे राज्य शासन, या नियमांचे उल्लंघन झाल्यास एक वर्ष मुदतीपर्यंतचा कारावास किंवा पाच हजार रुपये पर्यंतचा द्रव्यदंड किंवा दोन्ही, अशी शिक्षा विहीत करु शकेल.

(२) तसेच ज्याप्रसंगी सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयापूर्वी अपराध केला असेल किंवा असा अपराध वैधरित्या प्राधिकार चालविणा-या प्राधिका-यास प्रतिकार करण्याची तयारी करुन केला असेल त्याप्रसंगी अथवा अपराध करणा-या व्यक्तीस पूर्वी तशाच प्रकारच्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल, त्याप्रसंगी पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा करण्यात येईल, अशी उक्त नियमाव्दारे तरतूद करता येईल.

**४३. आगारात वन उत्पादनास नुकसान पोहोचल्याबद्दल शासन व वन अधिकारी जबाबदार असणार नाहीत.-** कोणतीही इमारती लाकडे किंवा इतर वन उत्पादन ही कलम ४१ अन्वये केलेल्या नियमानुसार स्थापन केलेल्या आगारात असतांना किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ ती इतरत्र अटकावून ठेवलेली असतांना ज्यांना कोणतीही हानी किंवा नुकसान पोहोचेल तर त्याबद्दल शासन जबाबदार राहणार नाही आणि अशी कोणतीही हानी किंवा नुकसानी कोणत्याही वन अधिका-याने हयगयीने, व्देषभावनेने किंवा लबाडीने केलेल्या कृत्यामुळे झालेली असल्यावाचून कोणीही वन अधिकारी अशा हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल जबाबदार राहणार नाही.

**४४. आगारात अपघात झाल्याच्या प्रसंगी सर्व व्यक्तींनी मदत करणे.-** अशा कोणत्याही मालमत्तेस धोका पोहोचेल, अशा कोणत्याही अपघाताच्या किंवा निकडीच्या प्रसंगी आगारात कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, मग त्यास शासनाने किंवा कोणत्याही खाजगी व्यक्तीने कामावर ठेवलेले असो, अशा प्रकारचा धोका टाळण्यासाठी किंवा अशा मालमत्तेस नुकसानीपासून किंवा हानीपासून वाचविण्यासाठी कोणत्याही वन अधिका-याने किंवा पोलीस अधिका-याने त्यांची मदत मागितली असता, अशा अधिका-यास सहाय्य करील.

## प्रकरण ८

## प्रवाहाधीन आणि काठांना लागलेली इमारती लाकडे गोळा करण्याबाबत

**४५. विवक्षित जातीच्या इमारती लाकडावरील हक्क सिध्द करण्यात येईपर्यंत ती सरकारची मालमत्ता आहे, असे मानले जाईल व ती त्याप्रमाणे गोळा करता येईल.-** (१) प्रवाहाधीन असलेली किंवा किना-यास असलेली, काठांना लागलेली किंवा बुडालेली सर्व इमारती लाकडे;

कलम ४१ खाली केलेल्या नियमान्वये नोंदविलेली नाहीत, अशी चिन्हे ज्या कोणत्याही लाकडावर किंवा इमारती लाकडावर असतील ती अथवा ज्यावरील चिन्हे विस्तवाने किंवा अन्य रीतीने नाहीशी करण्यांत आली असतील, किंवा ज्यावरील चिन्हात अशा रीतीने बदल करण्यात आला असेल किंवा ज्यावरील चिन्हे अशा रीतीने खराब करण्यात आली असतील अशी सर्व लाकडे किंवा इमारती लाकडे; आणि

राज्य शासन निर्देशित करेल अशा क्षेत्रात, चिन्हे नसणारी सर्व लाकडे व इमारती लाकडे:-

यावर कोणत्याही व्यक्तीने या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अधिकार व हक्क सिध्द केलेला नसेल तर आणि असा अधिकार व हक्क सिध्द करीपर्यंत, शासनाची मालमत्ता आहे, असे मानले जाईल.

(२) कोणत्याही वन अधिका-यास अशी इमारती लाकडे गोळा करता येतील किंवा कलम ५१ खाली केलेल्या नियमांच्या आधारे ज्या कोणत्याही इतर व्यक्तीस ती गोळा करण्याचा हक्क प्राप्त झाला असेल त्या व्यक्तीस देखील अशी लाकडे गोळा करता येतील आणि अशी प्रवाहित इमारती लाकडे ठेवण्यासाठी, वन अधिकारी अधिसूचित करील, त्या कोणत्याही आगारात त्यांना नेता येईल.

(३) राज्य शासन राजपत्रात केलेल्या अधिसूचनेद्वारे कोणत्याही वर्गाच्या इमारती लाकडांना या कलमाच्या तरतुदीतून सूट देऊ शकेल.

**४६. प्रवाहाधीन इमारती लाकडावर दावा सांगणा-या व्यक्तींना नोटीस देणे.-** कलम ४५ अन्वये गोळा केलेल्या इमारती लाकडाच्या संबंधात वन अधिका-याव्दारे वेळोवेळी एक जाहीर नोटीस देण्यात येईल. अशा नोटीशीत त्या इमारती लाकडाचे वर्णन करण्यात येईल तसेच त्या लाकडावर ज्या कोणत्याही व्यक्तीस आपला दावा प्रस्तुत करावयाचा आहे, तो दावा नोटीशीच्या तारखेपासून दोन महिन्यापेक्षा कमी नाही, अशा मुदतीत वन अधिका-याकडे लेखी निवेदनाव्दारे सादर करता येईल, असे विनिर्दिष्ट करेल.

**४७. अशा इमारती लाकडावर प्रस्तुत दाव्यासंदर्भात कार्यपध्दती.**- (१) जेव्हा उपरोक्तप्रमाणे अशा प्रकारे कोणतेही निवेदन सादर करण्यात आले असेल, तेव्हा वन-अधिका-यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आणि तसे करण्याविषयी आपली कारणे नमूद करुन, एकतर असा दावा नामंजूर करता येईल किंवा ती इमारती लाकडे असा दावा सांगणा-या व्यक्तीच्या स्वाधीन करता येतील.

(२) अशा इमारती लाकडावर एकाहुन अधिक व्यक्तींकडुन दावा सांगण्यात आला असेल तर, त्या बाबतीत वन अधिका-यास, एकतर अशा व्यक्तींपैकी ज्या कोणत्याही व्यक्तीचा त्या इमारती लाकडावर हक्क आहे असे त्यास वाटेल, त्या व्यक्तीच्या ती स्वाधीन करुन देता येतील किंवा दावा सांगणा-या व्यक्तीला अशा दाव्याच्या निर्णयासाठी दिवाणी न्यायालयात पाठविता येईल, आणि अशा लाकडाची विल्हेवाट लावण्याविषयी असा कोणत्याही न्यायालयातुन आदेश येईपर्यंत ती इमारती लाकडे ठेवून घेता येतील.

(३) ज्या व्यक्तीचा दावा या कलमान्वये नामंजुर करण्यात आला असेल, त्या व्यक्तीस, त्याने ज्यावर आपला दावा सांगितला असेल अशा इमारती लाकडाचा कब्जा मिळविण्यासाठी, दावा नामंजुर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत न्यायालयात फिर्याद करता येईल, परंतु या कलमाखाली दावा नामंजुर केल्याबद्दल किंवा कोणतीही इमारती लाकडे या कलमाखाली अटकावून ठेवल्याबद्दल किंवा ती काढून नेल्याबद्दल किंवा ती या कलमाखाली कोणत्याही इतर व्यक्तीच्या स्वाधीन केल्याबद्दल नुकसानभरपाई किंवा खर्च मिळण्यासाठी शासनाविरुध्द किंवा कोणत्याही वन अधिका-याविरुध्द कोणत्याही व्यक्तीस कोणताही दावा चालविता येणार नाही.

(४) या कलमात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे इमारती लाकडे, स्वाधीन करण्यात येईपर्यंत किंवा त्या संबंधात फिर्याद करण्यात येईपर्यंत त्या इमारती लाकडाच्या संबंधात कोणत्याही दिवाणी, फौजदारी किंवा महसुल न्यायालयाच्या कार्यवाहीच्या अधीन राहणार नाही.

**४८. ज्यावर दावा सांगण्यात आला नाही अशा इमारती लाकडाची विल्हेवाट लावणे.**- असे कोणतेही निवेदन उपरोक्तप्रमाणे सादर करण्यात आले नसेल किंवा कलम ४६ खाली दिलेल्या नोटीशीत सांगितलेल्या रीतीने व त्या नोटीशीद्वारे निश्चित केलेल्या मुदतीत कोणताही व्यक्ती कोणताही दावा प्रस्तुत करण्याचे वगळत असेल किंवा कोणत्याही व्यक्तीकडुन अशा रीतीने दावा सांगण्यात आल्यावर व तो नामंजुर करण्यांत आल्यावर कलम ४७ खाली निश्चित केलेल्या आणखी मुदतीत अशा इमारती लाकडांचा ताबा मिळण्यासाठी दावा दाखल करण्याचे वगळत असेल तर अशा इमारती लाकडाचे स्वामित्व सरकारकडे निहित होईल किंवा कलम ४७ खाली अशी इमारती लाकडे इतर कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात आली असतील तर, त्या इमारती लाकडाचे स्वामित्व त्याने निर्माण केलेले नसतील अशा सर्व भारापासून मुक्त होऊन अशा इतर व्यक्तीकडे निहित होईल.

**४९. अशा इमारती लाकडास पोहोचलेल्या नुकसानीबद्दल शासन व त्याचे अधिकारी जबाबदार असणार नाहीत.**-कलम ४५ अन्वये गोळा केलेल्या कोणत्याही इमारती लाकडास कोणत्याही स्वरुपाची हानी किंवा नुकसानी पोहोचेल तर त्याबाबत शासन जबाबदार असणार नाही आणि अशी कोणतीही हानी किंवा नुकसानी कोणत्याही वन अधिका-याने हयगयीने, दुष्ट हेतूने किंवा लबाडीने केलेल्या कृत्यामुळे झालेली असल्यावाचून, कोणीही वन अधिकारी अशा हानिबद्दल किंवा नुकसानीबद्दल जबाबदार असणार नाही.

**५०. इमारती लाकडे दावा सांगणा-या व्यक्तीच्या स्वाधीन करण्यापूर्वी त्याने द्यावयाची रक्कम.**-उपरोक्तप्रमाणे गोळा केलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या कोणत्याही इमारती लाकडाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडुन कलम ५१ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमावरुन त्याबाबत जी रक्कम देणे असेल ती रक्कम वन अधिका-यास किंवा ती घेण्याचा ज्या इतर व्यक्तीस हक्क असेल त्या व्यक्तीस देण्यात येईपर्यंत त्या कोणत्याही व्यक्तीस त्या इमारती लाकडाचा कब्जा मिळण्याचा हक्क असणार नाही.

**५१. नियम करण्याची व शास्ती निहित करण्याची शक्ती.**- (१) पुढील गोष्टीचे विनियमन करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील. त्या गोष्टी अशा:-

(ए) कलम ४५ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व इमारती लाकडाचे संरक्षण करणे व ती गोळा करणे व त्यांची विल्हेवाट लावणे;

(बी) इमारती लाकडाचे संरक्षण करण्यासाठी व ती गोळा करण्यासाठी ज्यांचा उपयोग केला असेल त्या नावाचा वापर करणे व त्यांची नोंदणी करणे;

(सी) अशा इमारती लाकडाचे संरक्षण करण्याबाबत, ती गोळा करण्याबाबत, एखाद्या जागेहून दुस-या जागी नेण्याबाबत, ती भरुन ठेवण्याबाबत किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याबाबत द्यावयाच्या रक्कमा; आणि

(डी) अशा प्रकारच्या लाकडावर चिन्हे करण्यासाठी ज्यांचा उपयोग करण्यांत येईल त्या हातोडयांचा व इतर औजारांचा (Implements) वापर करणे व त्यांची नोंदणी करणे.

(२) राज्य शासनास, या कलमान्वये केलेल्या नियमाद्वारे असेही विहित करता येईल की, अशा नियमांचे उल्लंघन केल्याबद्यल शास्ती म्हणुन सहा महिनेपर्यंत कारावास किंवा पाचशे रुपये पर्यंत द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होईल.

## प्रकरण ९

## शिक्षा आणि कार्यपध्दती

**५२. (सरकारजमा) होण्यास पात्र असलेली मालमत्ता जप्त करणे.-** (१) कोणत्याही वनउत्पादनाच्या संबंधात एखादा वन अपराध करण्यात आला आहे, जेव्हा असे समजण्यास कारण असेल, तेव्हा कोणताही वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी, असे उत्पादन आणि असा कोणताही अपराध करीत असतांना वापरण्यात आणलेली सर्व औजारे, नावा, वाहने किंवा गुरे जप्त करु शकेल.

(२) या कलमान्वये कोणतीही मालमत्ता जप्त करणारा प्रत्येक अधिकारी, ती मालमत्ता अशा रीतीने जप्त करण्यात आली आहे, असे दर्शविणारे एक चिन्ह त्या मालमत्तेवर किंवा ते ज्यामध्ये ठेवण्यात आले असेल असे पात्र किंवा वाहन (असल्यास) यावर उमटवेल आणि शक्य होईल तितक्या लवकर अशा जप्त मालमत्तेविषयीचे एक प्रतिवृत्त, ज्या अपराधाबद्दल ती मालमत्ता जप्त करण्यात आली असेल त्या अपराधाची संपरीक्षा (Trial) करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिका-याकडे पाठवेल.

परंतू असे की, ज्या वन उत्पादनासंबंधात असा अपराध करण्यात आला आहे, ती शासनाची मालमत्ता असल्याची खात्री असेल व अपराध करणारा व्यक्ती अज्ञात असेल तर, त्या अधिका-याने शक्य होईल तितक्या लवकर, त्याचे वरिष्ठ अधिका-याकडे, त्या परिस्थितीविषयी एक प्रतिवृत्त पाठविणे पुरेसे असेल.

परंतू पुढे असे की, ज्याच्यामुळे जप्ती करण्यात आली असेल असा अपराध इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जलतन, कोळसा किंवा राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित केलेले अन्य वनउत्पादन (यात यापुढे ज्याचा "अधिसूचित वनउत्पादन" म्हणून संदर्भ आहे) यांच्या संबंधातील असेल आणि ते वनउत्पादन राज्य शासनाची मालमत्ता असेल, त्या बाबतीत असा अधिकारी कलम ६१-ए अन्वये संबंधित प्राधिकृत अधिका-याला देखील अशा जप्तीबाबत अहवाल सादर करेल.

**स्पष्टीकरण :-** या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी शासनाची मालमत्ता किंवा राज्य शासनाची मालमत्ता या शब्द प्रयोगात फॉरेस्ट डेव्हेलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड यांचे मालकीच्या मालमत्तेचा समावेष होतो.

**५३. कलम ५२ अन्वये जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्याची शक्ती.-** वनक्षेत्रपाल दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही वन अधिका-यास, ज्याने किंवा ज्याच्या कनिष्ठाने कलम ५२ अन्वये कोणतीही औजारे, नावा, वाहने किंवा गुरे जप्त केली असतील, तर ती ज्या अपराधाच्या संदर्भात जप्त करण्यात आली असतील, त्या अपराधाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिका-यासमोर जर

आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा प्रस्तुत केली जातील, संबंधित मालकाने असे बंधपत्र निष्पादित केल्यावर कलम ६१जी च्या अधीन राहून मुक्त करता येईल.

**५४. जप्तीचे प्रतिवृत्त प्राप्त झाल्यावर दंडाधिका-याने अनुसरावयाची पध्दती.-** कलम ५२ चे पोटकलम (२) खाली कोणतेही प्रतिवृत्त मिळाल्यानंतर, दंडाधिकारी सोईस्कर असेल, त्याप्रमाणे शक्य तितक्या लवकर अपराध्याला अटक करण्यासाठी व त्याची संपरीक्षा करण्यासाठी आणि कलम ५८ आणि ६१ जी यास अधीन राहून, कायद्यानुसार मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असेल, अशी उपाययोजना करेल.

**५५. वन-उत्पादन, औजारे, इत्यादी सरकारजमा केली जाण्यास केव्हा पात्र ठरेल.-** (१) ज्याचे संबंधात एखादा वन अपराध करण्यात आला असेल, शासनाची मालमत्ता नसलेले असे सर्व इमारती लाकूड किंवा वनउत्पादन आणि अपराध करतांना वापरण्यात आलेली सर्व औजारे, नावा, वाहने आणि गुरे, कलम ६१ जी यास अधिन राहून सरकारजमा होण्यास पात्र होतील.

(२) सदर सरकारजमा विषयक कारवाई अशा अपराधाबद्दल जी कोणतीही शिक्षा विहित करण्यात आली असेल, त्याव्यतिरिक्त असेल.

**५६. ज्या उत्पादनाच्या संबंधात वन अपराध करण्यात आला असेल, त्या अपराधाची संपरीक्षा संपुष्टात आल्यावर त्या उत्पादनाची विल्हेवाट लावणे.-** जेव्हा कोणत्याही वन अपराधाची संपरीक्षा संपुष्टात आली असेल, तेव्हा ज्या वन उत्पादनाच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल ते उत्पादन, जर ती शासनाची मालमत्ता असेल किंवा सरकारजमा करण्यात आली असेल, तर वन अधिकारी ताब्यात घेईल आणि अन्य कोणत्याही प्रकरणी कलम ६१-जी यास अधीन राहून न्यायालयाचे निर्देशानुसार त्याची विल्हेवाट लावण्यात येईल.

**५७. वन अपराध करणारा ज्ञात नसेल किंवा सापडणे शक्य नसेल तेव्हाची कार्यपध्दती.-** जेव्हा अपराध करणारा ज्ञात नसेल किंवा सापडत नसेल आणि अपराध करण्यात आलेला आहे, असे दंडाधिका-यास आढळून आल्यास, कलम ६१-जी यास अधिन राहून, तो अपराध ज्या मालमत्तेच्या संबंधात करण्यात आलेला आहे ती मालमत्ता, अपराध करतांना वापरण्यात आलेली औजारे, नावा, वाहन, गुरे आणि अन्य साहित्यासह सरकारजमा करण्याचे आणि वन-अधिका-याने ताब्यात घेण्याचे किंवा ती मालमत्ता ज्या व्यक्तीस अनुज्ञेय आहे, त्या व्यक्तीच्या स्वाधीन करण्याचे आदेश न्याय दंडाधिका-यास पारित करता येईल.

परंतु अशी मालमत्ता जप्त केल्याच्या तारखेपासून एक महिन्याची मुदत संपेपर्यंत किंवा त्या मालमत्तेवर कोणताही हक्क प्रस्तुत करणा-या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावाचून आणि त्याचे

समर्थनार्थ तो जो कोणताही पुरावा प्रस्तुत करील, तो विचारात घेतल्यावाचून असा कोणताही आदेश पारित केला जाणार नाही.

**५८. कलम ५२ अंतर्गत जप्त करण्यात आलेल्या नाशवंत मालमत्तेबाबत कार्यपध्दती.-** या अधिनियमात किंवा इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, ज्याने कलम ५२ खाली जप्ती केली असेल, असा वन अधिकारी कलम ५२ अन्वये जप्त केलेल्या आणि निसर्गत:च व लवकर खराब होणा-या कोणत्याही मालमत्तेची विक्री करु शकेल आणि ती मालमत्ता विकण्यात आली नसती, तर ज्या पध्दतीने तीची विल्हेवाट लावण्यात आली असती, त्याच पध्दतीने विक्रीच्या उत्पन्नाची विल्हेवाट लावू शकेल आणि अशा प्रत्येक विक्रीबाबत त्याच्या वरीष्ठास कळवेल.

**५९. कलम ५५, कलम ५६ किंवा कलम ५७ खाली आदेशाविरुध्द अपील.-** कलम ५२ खाली ज्या अधिका-याने मालमत्ता जप्त केली असेल त्या अधिका-यास किंवा त्याच्या वरीष्ठ अधिका-यांपैकी कोणत्याही अधिका-यास किंवा अशा जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेत आपला हितसंबंध प्रस्तुत करणा-या कोणत्याही व्यक्तीस कलम ५५ किंवा कलम ५६ किंवा कलम ५७ खाली पारित झालेल्या आदेशाविरुध्द अशा आदेशाचे तारखेपासून एक महिन्याच्या आत, अशा दंडाधिका-याने दिलेल्या आदेशावर सामान्यपणे ज्या न्यायालयात अपील दाखल करता येते, त्या न्यायालयात असे अपील दाखल करता येईल आणि अशा अपीलात पारित झालेला आदेश अंतिम असेल.

**६०. मालमत्ता शासनाकडे केव्हा निहित होईल.-** कलम ५५ किंवा यथास्थितीत कलम ५७ खाली कोणतीही मालमत्ता सरकारजमा करण्यासंबंधीचा आदेश पारित झाला असेल आणि अशा आदेशावर अपील करण्यासाठी कलम ५९ खाली ठरवून दिलेली मुदत संपुष्टात आलेली असेल व असे कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल किंवा असे अपील दाखल करण्यात आले असून, अपीलीय न्यायालयाने अशा संपूर्ण मालमत्तेच्या संबंधात किंवा यथास्थितीत तिच्या भागाच्या संबंधात जो आदेश कायम केला असेल, तेव्हा संपूर्ण मालमत्ता किंवा यथास्थितीत तिचा असा भाग सर्वप्रकारे बोजारहित होऊन शासनाकडे निहित होईल.

**६१. जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्याच्या शक्तीचा बचाव.-** कलम ५२ खाली जप्त केलेली व जी शासनाची मालमत्ता नाही, अशी कोणतीही मालमत्ता तात्काळ मुक्त करण्याविषयी आणि अशा मालमत्तेच्या संबंधातील कोणताही दोषारोप काढून घेण्याविषयी कोणत्याही वेळी निर्देश देण्याची शक्ती ज्या कोणत्याही अधिका-यास राज्य शासनाने प्रदान केली असेल, त्या कोणत्याही अधिका-याने तसा निर्देश देण्यास यात यापूर्वी केलेल्या कोणत्याही तरतूदीमुळे प्रतिबंध येत आहे, असे मानले जाणार नाही.

**६१ए. वन अपराध करण्यात आला असल्याची खात्री असल्यावर वन अधिका-याद्वारे वनउत्पादन सरकारजमा करणे.-** (१) या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतूदीत किंवा इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी जेथे राज्य शासनाची मालमत्ता असलेल्या इमारती लाकूड, चंदन लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा इतर अधिसूचित वन-उत्पादन यांचेबाबत वन अपराध घडल्याची खात्री असेल तेव्हा कलम ५२ चे पोटकलम (१) खाली मालमत्ता जप्त करणारा अधिकारी अपराधात वापरण्यात आलेले सर्व औजारे, नावा, वाहने, आणि गुरे यासह, राज्य शासनाने या संबंधात राजपत्रात अधिसूचनेद्वारे प्राधिकृत केलेल्या सहाय्यक वनसंरक्षक दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यापुढे (यात यापुढे ज्याचा "प्राधिकृत अधिकारी" म्हणून संदर्भ आहे) वाजवी दिरंगाईशिवाय प्रस्तुत करेल.

(२) राज्य शासन कोणतेही स्थानिक क्षेत्राकरिता एक किंवा अधिक अधिकारी यांना पोट कलम (१) खाली प्राधिकृत करु शकेल.

(३) कलम ५२ च्या पोट-कलम (१) खाली, राज्य शासनाची मालमत्ता असलेले कोणतेही इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन जप्त केले असेल किंवा असे कोणतेही वन उत्पादन पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही प्राधिकृत अधिका-यासमोर सादर केले असेल आणि अशा वन उत्पादनाच्या संबंधात वन विषयक अपराध घडला असल्याबद्दल त्या अधिका-याची खात्री पटेल त्या बाबतीत, असा अपराध घडल्याबद्दल खटला दाखल केलेला असला किंवा नसला तरीही, तो प्राधिकृत अधिकारी, अशा प्रकारे जप्त केलेल्या वन उत्पादनाचा वन अधिका-याने ताबा घेण्याचा आदेश देईल, आणि तो अपराध करताना वापरलेली सर्व हत्यारे (Tools), नावा, वाहने व गुरेढोरे सरकारजमा करण्याचा आदेश पारित करु शकेल.

(४)(ए) पोट-कलम (३) अन्वये, सरकारजमा करण्याबाबतचा आदेश दिल्यानंतर, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे प्राधिकृत अधिका-याचे मत होईल त्याबाबतीत, त्यास सरकारजमा करण्यात आलेली सर्व हत्यारे (Tools), नावा, वाहने व गुरेढोरे यांची विक्री करण्याचा आदेश देता येईल.

(बी) जेथे कोणतीही सरकारजमा केलेली औजारे, नावा, वाहने आणि गुरेढोरे वरील प्रमाणे विक्री केली जातील, विक्री विषयक खर्च किंवा इतर प्रासंगिक खर्च वजा जाता, विक्री उत्पन्नामधून राहिलेली शिल्लक रक्कम ही, कलम ६१सी किंवा कलम ६१डी खाली आदेशाद्वारे सरकारजमा करण्याचा आदेश रद्द किंवा निष्प्रभावित झाल्यावर, मालमत्तेच्या मालकाला किंवा ज्याचेकडून ती जप्त करण्यात आली होती, त्यास उक्त आदेशात नमूद असल्याप्रमाणे अदा केली जाईल.

**६१(बी). कलम ६१ए खाली मालमत्ता सरकारजमा करण्यापूर्वी कारण दाखवा नोटीस जारी करणे.-** (१) ज्या व्यक्तिकडून जप्ती करण्यात आली आहे त्यास लेखी नोटीस दिल्याशिवाय आणि तीचे

कोणतेही आक्षेप असल्यास, ते विचारात घेतल्याशिवाय कलम ६१-ए अन्वये औजारे, नावा, वाहने आणि गुरे सरकारजमा करण्याचे आदेश केले जाणार नाहीत:

परंतु असे की, मोटरवाहन सरकारजमा करण्याचे आदेश, जर प्राधिकृत अधिका-याच्या मते व्यवहार्य वाटत असेल तर त्याचे पंजीकृत मालकाला लेखी नोटीस दिल्याशिवाय आणि त्याचे कोणतेही आक्षेप असल्यास, ते विचारात घेतल्याशिवाय पारित केले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदीस बाधा न आणता औजारे, नावा, वाहने किंवा गुरांचा मालक, प्राधिकृत अधिकारी यांचे समाधान होईल, अशा रितीने जर असे सिध्द करेल की, मालकाच्या स्वत:च्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या किंवा ताबेदार यांचे माहितीशिवाय किंवा सम्मतीशिवाय त्यांचा वापर इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळावू लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन यांची वाहतूक करण्यासाठी करण्यात आला होता आणि औजारे, नावा, वाहने किंवा गुरे यांचा ताबा असणा-या व्यक्तीपैकी प्रत्येकाने त्याचा तसा वापर होऊ नये म्हणून शक्य व आवश्यक तेवढी सर्व खबरदारी घेतली होती, तर कलम ६१ए खाली कोणतेही औजार, नाव, वाहन किंवा गुरेढोरे सरकारजमा करण्याचे आदेश केले जाणार नाही.

(३) अपराधीची अथवा कलम ५२ च्या पोट-कलम (१) अन्वये जप्त केलेल्या कोणत्याही हत्याराचा (Tools), नावेचा, वाहनाचा किंवा गुराढोरांचा मालक अज्ञात असेल अथवा तो सापडत नसेल, आणि राज्य शासनाची मालमत्ता असेल, असे इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, चंदनी लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन याबाबत वन अपराध करतांना या गोष्टीचा वापर करण्यात आला असल्याबद्दल प्राधिकृत अधिका-यांची खात्री पटली असेल त्याबाबतीत, पूर्वगामी तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकृत अधिका-यास कलम ६१-ए मध्ये समाविष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन, आदेश काढता येईल:

परंतु असे की, अशी मालमत्ता जप्त केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त होईपर्यंत अथवा त्याबाबत कोणताही हक्काचा दावा करणा-या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय असा कोणताही आदेश पारित केला जाणार नाही.

**६१सी. पुर्नविलोकन.-** राज्य शासनाव्दारे राजपत्रात अधिसूचनेद्वारे विशेषत्वाने प्राधिकृत केलेल्या वनसंरक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही वन अधिकारी स्वत: होऊन, प्राधिकृत अधिका-यांने कलम ६१ए अन्वये केलेले आदेशाचा अभिलेख मागवून तपासू शकतो आणि चौकशी करु शकतो आणि चौकशी करवून घेवू शकतो आणि त्यास योग्य वाटत असलेले आदेश पारित करु शकतो.

पंरतु, अशा आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर असा अभिलेख मागविता येणार नाही आणि जर दरम्यानच्या कालावधीत प्राधिकृत अधिका-यांचे आदेशा विरुध्द कलम ६१डी खाली अपिल दाखल झाले असेल तर या कलमान्वये आदेश पारित करता येणार नाहीत:

पंरतु, व्यक्तीला त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्याशिवाय त्याच्याप्रती पूर्वगृहदुषीत विचाराने या कलमाखाली आदेश पारित केले जाणार नाहीत.

**६१डी. अपील.-** (१) कलम ६१ए किंवा कलम ६१सी खाली पारित झालेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ति त्याला आदेश कळविल्यापासुन ३० दिवसाचे आत ज्या क्षेत्रात मालमत्ता आणि औजारे, नावा, वाहाने आणि गुरेढोरे जप्त करण्यात आली त्यावर अधिकारिता असलेल्या सत्र न्यायाधिशापुढे अपिल दाखल करु शकतो आणि अपीलकर्ता, प्राधिकृत अधिकारी किंवा यथास्थितीत कलम ६१सी खाली विशेषत्वाने प्राधिकृत केलेला अधिकारी यांना त्याची बाजू मांडण्याची संधी देवून सत्र न्यायाधीश, त्यास सुयोग्य वाटेल त्याप्रमाणे आहवानित आदेशावर शिक्कामोर्तब करेल किंवा त्यात सुधारणा करेल किंवा रद्दबातल करेल.

(2) पोट कलम (१) खालील सत्र न्यायाधिशांचे आदेश हे अंतिम असतील आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात प्रश्न उपस्थित केला जाणार नाही.

**६१ई. सरकारजमा बाबतचा निवाडा इतर शिक्षेस बाधित करणार नाही.-** कलम ६१ए किंवा कलम ६१सी किंवा ६१डी खालील सरकारजमासंबंधी आदेश, हे संबंधित व्यक्तीस या अधिनियमाखाली किंवा अंमलात असलेल्या अन्य अधिनियमाखाली शिक्षा ठोठविल्या जाण्याबाबत प्रक्रियेपासून रोखू शकणार नाही.

**६१एफ. सरकारजमा केलेली मालमत्ता, इत्यादी शासनाकडे केव्हा निहित होईल.-** कोणतीही मालमत्ता सरकारजमा करण्यासाठी कलम ६१-ए किंवा कलम ६१-सी अन्वये आदेश पारित करण्यात आला असेल, आणि अशा आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यासाठी कलम ६१-डी मध्ये तरतूद केलेला कालावधी संपुष्टात आला असेल, आणि असे कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा किंवा असे अपील दाखल करण्यात आल्यावर, अपील न्यायालयाने, अशा संपूर्ण मालमत्तेच्या किंवा तिच्या भागाच्या संबंधात, असा आदेश कायम केला असेल तेव्हा, अशी मालमत्ता किंवा तिचा असा भाग, किंवा जर ती मालमत्ता, कलम ५८ अन्वये किंवा, यथास्थिति, कलम ६१-ए च्या पोट-कलम (४) च्या खंड (ए) अन्वये विकण्यात आली असेल तर, तिच्या विक्रीचे उत्पन्न, सर्वप्रकारे बोजारहित होऊन राज्य शासनाकडे निहित होईल.

**६१जी. विवक्षित प्रकरणी अधिकारितेस रोध.-** जेव्हा राज्य शासनाची मालमत्ता असलेले कोणतेही इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा इतर कोणतेही अधिसूचित वन उत्पादन आणि कोणताही वन अपराध करतांना वापरण्यात आलेल्या औजारे, नावा, वाहने आणि गुरेढोरे यासह कलम ५२ (१) खाली जप्त करण्यात आले असतील, तेव्हा कलम ६१ए खालील प्राधिकृत अधिकारी किंवा कलम ६१सी खाली विशेषत्वाने प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा कलम ६१डी खाली अपीलाची सुनावणी करणारे सत्र न्यायाधीश यांना सदर मालमत्ता आणि औजारे, नावा, वाहाने, गुरेढोरे यांची अभिरक्षा, ताबा, विल्हेवाट, वितरण याबाबत आदेश काढण्याची अधिकारिता असेल आणि या अधिनियमात इतरत्र किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये किंवा अंमलात असलेल्या इतर कायद्यात विपरीत तरतूद असली तरी अन्य कोणताही अधिकारी, न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण, यास सदर मालमत्ता आणि औजारे, नावा, वाहाने, गुरे यांची अभिरक्षा, ताबा, विल्हेवाट किंवा वितरण याबाबत आदेश करण्याची अधिकारिता असणार नाही.

**६२. अन्याय्याने केलेल्या जप्तीबद्दल शिक्षा.-** (१) जो कोणीहि वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी, या अधिनियमाखाली सरकारजमा करण्यास पात्र ठरणारी मालमत्ता म्हणुन ती जप्त करावयाची आहे, या सबबीवर कोणतीही मालमत्ता, त्रास देण्याच्या हेतूने किंवा कोणतेही कारण नसताना जप्त करील, तो सहा महिनेपर्यंत मुदतीचा कारावास किंवा पाचशे रुपयेपर्यंत द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

(२) अशा रीतीने लावण्यात आलेला कोणताही द्रव्यदंड किंवा त्याचा कोणताही भाग जर सिध्दापराध ठरविणा-या न्यायालयाने तसा निर्देश दिला तर, अशा जप्तीमुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस भरपाई म्हणून दिला जाईल.

**६३. वृक्षावर व इमारती लाकडावर बनावट चिन्हे करण्याबद्दल किंवा त्यावरील चिन्हे खराब करण्याबद्दल आणि हद्दीच्या चिन्हात बदल करण्याबद्दल शास्ती.-** लोकांचे किंवा कोणत्याही व्यक्तीचे नुकसान करण्याच्या किंवा त्यांना अपाय करण्याच्या इराद्याने किंवा भारतीय दंड संहिता (सन १८६० चा अधिनियम क्रमांक (४५) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला अन्याय्य लाभ करुन घेण्याच्या इराद्याने जो कोणीही,---

(ए) कोणतेही इमारती लाकुड किंवा उभे वृक्ष शासनाची किंवा एखाद्या व्यक्तीची मालमत्ता आहे, हे दर्शविण्यासाठी अथवा असे लाकुड किंवा वृक्ष एखाद्या व्यक्तीस वैधरित्या कापता येईल किंवा कादुन नेता येईल हे दर्शविण्यासाठी वन अधिका-याकडून ज्या चिन्हाचा उपयोग करण्यात येत असेल त्या

चिन्हासारखेच असणारे बनावट चिन्ह जाणूनबूजून त्या इमारती लाकडावर किंवा उभ्या वृक्षावर करील; अथवा

(बी) कोणत्याही वृक्षावर किंवा इमारती लाकडावर एखाद्या वन अधिका-याने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये कोणत्याही अधिका-याने केलेल्या अशा चिन्हात बदल करील किंवा ते खराब करील किंवा नाहीसे करील; अथवा

(सी) ज्या कोणत्याही वनास किंवा पडित जमिनीस या अधिनियमाच्या तरतुदी लागू असतील त्या वनाच्या किंवा पडित जमिनीच्या कोणत्याही हद्दीच्या चिन्हात बदल करील, ते हलवील, त्याचा नाश करील किंवा ते खराब करील;

तो दोन वर्षाच्या मुदतीपर्यंत कारावास किंवा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

**६४. अधिपत्रावाचून अटक करण्याची शक्ती.-** (१) कोणत्याही वन अधिका-यास, पोलीस अधिका-यास किंवा महसुल अधिका-यास, ज्या कोणत्याही वन अपराधाबद्दल एका महिन्याची किंवा त्याहुन अधिक कारावासाची शिक्षा होण्याजोगी असेल, अशा कोणत्याही वन अपराधाशी संबंधित असल्याबद्दल ज्याचा वाजवी रीतीने संशय येईल, त्या व्यक्तीला दंडाधिका-याच्या आदेशावाचून व अधिपत्रावाचून अटक करता येईल.

(२) या कलमाखाली अटक करणारा प्रत्येक अधिकारी, हा अनावश्यक विलंबाशिवाय आणि बंधपत्रावर मुक्त करुन देण्यासंबंधी असलेल्या या अधिनियमाच्या तरतूदीस अधीन राहून, अटक केलेल्या व्यक्तीस, प्रकरणाबाबत अधिकारिता असलेल्या दंडाधिका-यासमोर किंवा सर्वात जवळील ठाण्याच्या अंमलदार अधिका-यासमोर नेईल किंवा पाठवेल.

(३) कलम ३० चे खंड (सी) खाली प्रतिबंधित असल्याशिवाय प्रकरण ४ खाली अपराध ठरत असलेल्या कृत्याबद्दल अशा रीतीने अटक करण्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे प्राधिकार मिळतो, असे मानले जाणार नाही.

**६५. अटक केलेल्या व्यक्तीस बंधपत्रावर मुक्त करण्याची शक्ती.-** क्षेत्रपाल दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही वन अधिका-यास किंवा उप-निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास किंवा महालकरी किंवा तहसीलदार दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही महसुल अधिका-यास, ज्याने किंवा ज्याच्या कनिष्ठाने कलम ६४ च्या तरतुदीखाली कोणत्याही व्यक्तीस अटक केली असेल तर, कलम ६५ए च्या तरतूदीस अधीन राहून आणि त्यास बाधा न आणता, अशा व्यक्तीने, प्रकरणाबाबत अधिकारिता असलेल्या दंडाधिका-यासमोर किंवा सर्वात जवळील ठाण्याच्या अंमलदार

अधिका-यासमोर जर आणि जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा हजर होण्याविषयी बंधपत्र निष्पादित केल्यावर मुक्त करता येईल.

**६५-ए. विवक्षित अपराध अजामीनपात्र असणे.-** या अधिनियमामध्ये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी---

(ए) खंड (बी) मध्ये उल्लेख केलेल्या कलमाखाली किंवा कलमाच्या खंडाखालील अपराध अजामीनपात्र असतील.

(बी) खंड (ए) मध्ये उल्लेख केलेली कलमे आणि कलमाचे खंड पुढील प्रमाणे आहेत:---

कलम २६ पोट-कलम (१) चे खंड (ए), (बी), (डी), (एफ), (जी), (एच) आणि (आय) आणि पोट-कलम (४)
कलम ३३ पोट-कलम (१) चे खंड (ए), (बी), (सी), (डी), (एफ) आणि (एच)
कलम ४२
कलम ६३.

(सी) खंड (बी) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणतीही आरोपित व्यक्ती अभिरक्षेत असल्यास:---

(i) अभियोग पक्षास अशा मुक्ततेच्या अर्जाला विरोध करण्याची संधी दिल्याशिवाय, आणि

(ii) जेथे अभियोग पक्ष अर्जाचा विरोध करीत आहे, ती अशा अपराधाबद्दल दोषी नाही, असे मानण्यास वाजवी कारण आहे, याबद्दल न्यायालयाचे समाधान झाल्याशिवाय,

त्याला जामिनावर किंवा त्याच्या स्वत:च्या बंधपत्रावर मुक्त केले जाणार नाही.

**६६. अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याची शक्ती.-** प्रत्येक वन अधिकारी, पोलीस अधिकारी व महसूल अधिकारी, हा वन अपराधावर प्रतिबंध करेल आणि वन-अपराध घडण्यावर प्रतिबंध करण्याचे प्रयोजनार्थ हस्तक्षेप करु शकेल.

**६६ए.** जी व्यक्ती, कोणताही वन अपराध करण्यास अपप्रेरणा देईल, ती व्यक्ती जर अपप्रेरणा दिलेला अपराध हा, अपप्रेरणेचा परिणाम म्हणून घडलेला असेल तर, अशा अपराधासाठी ज्या शिक्षेची तरतूद केली असेल ती शिक्षा होण्यास पात्र ठरेल.

**६७. अपराधाची संपरीक्षा करण्याची शक्ती.-** उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन राज्य शासनाव्दारे याबाबतीत विशेषरित्या शक्ती प्रदान केलेला कोणताही प्रथम वर्ग दंडाधिकारी हा, एक वर्षापेक्षा जास्त नाही, इतकी कारावासाची शिक्षा किंवा रुपये पाच हजार द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद असणा-या अपराधाची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ खाली संक्षिप्तरित्या संपरीक्षा करु शकेल आणि उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरुन) अशा संपरिक्षेच्या बाबतीत लागू होतील.

परंतू उक्त संहितेत काहीही अंतर्भूत असले तरीही, या कलमाखाली संक्षिप्त संपरीक्षेत अपराधसिध्द झाल्याच्या स्थितीत त्या अपराधासाठी ज्या शिक्षेची तरतुद आहे, ती शिक्षा ठोठावणे न्यायदंडाधिका-यासाठी विधीसंमत राहील.

**६८. अपराधांची तडजोड करण्याची शक्ती.**- (१) पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, राज्य शासनास, राजपत्रात केलेल्या अधिसूचनेद्वारे एखाद्या वन अधिका-यास-

(ए) ज्याने कलम २६ चे पोट-कलम (४) किंवा कलम ६२ किंवा कलम ६३ यात विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाव्यतिरिक्त इतर कोणताही वन अपराध केल्याचा ज्याच्या बाबतीत वाजवीरीतीने संशय असेल, त्या व्यक्तीकडुन त्याने जो अपराध केला असल्याचा संशय असेल त्या अपराधाबद्दल नुकसानभरपाई म्हणून, स्वविवेकानुसार अशी रक्कम स्विकारण्याचा; आणि

(बी) सरकारजमा होण्यास पात्र असलेली कोणतीही मालमत्ता जप्त करण्यांत आली असेल तर, अशा अधिका-याने त्याचे नेमुन दिलेले मुल्य मिळाल्यावर ती मुक्त करण्याची शक्ती प्रदान करता येईल.

(२) अशा अधिका-यास ती रक्कम किंवा नेमून दिलेले मूल्य किंवा यथास्थितीत दोन्ही अदा केल्यावर, अशी संशयीत व्यक्ती जर अभिरक्षेत असेल तर मुक्त केली जाईल, कोणतीही मालमत्ता जप्त करण्यात आली असेल, तर ती मुक्त केली जाईल आणि जेथे आवश्यक असेल, तेथे कलम ८२ खाली कार्यवाहीव्यतिरिक्त इतर कोणतीही कार्यवाही अशा व्यक्तीविरुध्द किंवा मालमत्तेच्या संबंधात केली जाणार नाही.

(३) वनक्षेत्रपाल दर्जापेक्षा कमी नसलेले आणि किमान शंभर रुपयाच्या रकमेइतके दरमहा वेतन मिळत नसलेल्या वन अधिका-यास या कलमाखाली शक्ती प्रदान केली जाणार नाही आणि पोट-कलम (१) खंड (ए) खाली नुकसानभरपाई म्हणून स्वीकारावयाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**६९. वन उत्पादन सरकारच्या मालकीचे आहे असे गृहीत धरणे.**- या अधिनियमाखाली घेतलेल्या कोणत्याही कार्यवाहीत किंवा या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या परिणामस्वरुप कोणतेही वन उत्पादन शासनाची मालमत्ता आहे, जेव्हा असा प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा असे उत्पादन शासनाची मालमत्ता आहे, असे गृहीत धरले जाईल, जोपर्यंत तद्विरुध्द सिध्द होत नाही.

## प्रकरण १०
## गुरांचा अपप्रवेश

**७०. गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ लागु होणे.**- एखाद्या राखीव वनात किंवा एखाद्या संरक्षित वनाच्या ज्या कोणत्याही भागात गुरे चारण्याचे वैधरित्या बंद करण्यात आले असेल, अशा त्या वनाच्या भागात कोणतीही गुरे अपप्रवेश करतील तर ती, गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ याचे कलम ११ च्या अर्थानुसार सार्वजनिक लागवडीस नुकसान पोहोचविणारी गुरे आहेत, असे मानण्यात येईल आणि कोणत्याही वन अधिका-यास किंवा पोलीस अधिका-यास अशी गुरे जप्त करता येतील व कोंडवाडयात ठेवता येईल.

**७१. त्या अधिनियमान्वये ठरवून दिलेल्या दंडात बदल करण्याची शक्ती.**- राज्य शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमाच्या कलम ७० खाली कोंडवाडयात ठेवलेल्या गुरांपैकी प्रत्येक गुराबद्दल, गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ याच्या कलम १२ खाली ठरवून दिलेल्या दंडाच्या रकमाऐवजी पुढे नमुद केलेल्या रकमाहून अधिक असणार नाहीत, अशा ज्या रकमा दंडादाखल वसुल करणे राज्य शासनास योग्य वाटेल, त्या रकमा वसूल करण्यात येतील:--

| | |
|---|---|
| प्रत्येक हत्तीबद्दल | ---- दोनशे रुपये |
| प्रत्येक म्हशीबद्दल किंवा उंटाबद्दल | ---- दोनशे रुपये |
| प्रत्येक घोडा, घोडी, खच्ची केलेला घोडा, तट्टू, शिंगा, शिंगी, खेचर, वळू, बैल,गाय किंवा कालवड यांच्याबद्दल | --- दोनशे रुपये |
| प्रत्येक वासरु, गाढव, डुक्कर, एडका, मेंढी, मेंढा, कोकरु शेळी किंवा करडू याबद्दल | --- शंभर रुपये |

## प्रकरण ११
## वन अधिका-यांबाबत

**७२. राज्य शासन वन अधिका-यांकडे काही विवक्षित शक्ती निहित करु शकते.**- (१) राज्य शासन कोणत्याही वन अधिका-यात खालीलपैकी एक किंवा सर्व शक्ती निहित करु शकेल जसे -

(ए) कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे आणि तिचे सर्वेक्षण करणे, हद्दीच्या खुणा करणे, आणि त्याचा नकाशा तयार करणे;

(बी) साक्षीदारांना हजर होण्यास बाध्य करणे आणि दस्ताऐवज व साहित्य वस्तू प्रस्तुत करण्याविषयी दिवाणी न्यायालयाची शक्ती;

(सी) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ खाली झडती-अधिपत्र जारी करण्याची शक्ती;

(डी) वन अपराधाची चौकशी करणे आणि अशी चौकशी चालू असतांना पुरावे घेण्याची व नोंदविण्याची शक्ती;

(२) पोट कलम (१) चा खंड (डी) खाली नोंदविलेला कोणताही पुरावा तद्नंतर दंडाधिका-यापुढे चालविण्यात येणा-या कोणत्याही संपरीक्षेत ग्राहय राहील, परंतू असा पुरावा आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेतलेला असावा.

**७३. वनअधिकारी लोकसेवक मानण्यात येतील.-** सर्व वन अधिकारी भारतीय दंड संहितेच्या अर्थानुसार लोकसेवक म्हणून मानले जातील.

**७४. सद्भावपूर्वक केलेल्या कृत्याबद्दल हानिरक्षण.-** या अधिनियमाखाली कोणत्याही लोक सेवकाने सद्भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल त्याचेविरुध्द कोणताही दावा चालविता येणार नाही.

**७५. वन अधिका-यांना व्यापार करता येणार नाही.-** राज्य शासनाच्या लेखी परवानगीशिवाय कोणताही वन अधिकारी, हा अधिनियम लागू असलेल्या प्रदेशात किंवा त्याबाहेर प्रमुख म्हणून किंवा अभिकर्ता म्हणून इमारती लाकडांचा किंवा इतर वन उत्पादनाचा व्यापार करणार नाही अथवा कोणत्याही वनाबाबत दिलेल्या कोणत्याही पट्ट्यात किंवा वनात काम करण्याविषयी कोणत्याही करारात हितसंबंध ठेवणार नाही.

## प्रकरण १२

## दुय्यम नियम

**७६. नियमावली तयार करण्यासाठी अतिरिक्त शक्ती.-** राज्य शासन पुढील बाबीविषयी नियम करु शकेल -

(ए) या अधिनियमाखाली कोणत्याही वन अधिका-याची शक्ती आणि कर्तव्य विहित व मर्यादित करणे;

**(बी)** या अधिनियमाखाली केलेला दंड किंवा सरकारजमा केलेल्या मालमत्तेच्या उत्पन्नातून वन अधिका-यांना व खब-यांना द्यावयाच्या बक्षिसांचे विनियमन करणे;

**(सी)** राज्य शासनाच्या मालकीची तथापि खाजगी व्यक्तींच्या किंवा त्यांचे ताब्यात असलेल्या जमिनीवर उत्पादित वृक्षांचे व इमारती लाकडांचे संगोपन, पुनर्उत्पादन आणि विल्हेवाट लावणे;

**(डी)** सामान्यत: या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणणे;

**७७. नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.-** या अधिनियमाखाली विशेष शिक्षेची तरतुद नसलेले नियमांचे उल्लंघन करणारा व्यक्ती एक महिना मुदतीपर्यंतचा कारावास किंवा पाचशे रुपये पर्यंतचा द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

**७८. नियमांना विधीचा अंमल केव्हा प्राप्त होईल.-** (१) राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम राजपत्रात प्रसिध्द केले जातील, तद्नंतर असे नियम जेथवर ते या अधिनियमांशी सुसंगत असतील तेथवर जणू ते प्रस्तुत अधिनियमात अधिनियमित करण्यात आले होते, असे समजून परिणामक्षम असतील.

(२) या अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेले सर्व नियम, ते तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधीमंडळाच्या प्रत्येक सभागृहाच्या पटलावर तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवसात ठेवण्यात येतील आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील, त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधीमंडळ त्यात जे फेरफार करील व राजपत्रात प्रसिध्द करील, त्या फेरफारास अधीन असतील.

## प्रकरण १३

## संकिर्ण

**कलम ७९. वन अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना सहाय्य देण्यासाठी बांधील असलेल्या व्यक्ती.-**

(१) एखाद्या राखीव वनात किंवा संरक्षित वनात, जी व्यक्ती कोणताही हक्क उपभोगत असेल, किंवा ज्या व्यक्तीला कोणतेही वन-उत्पादन त्या वनातून घेण्याची, किंवा त्यातील इमारती लाकडे कापण्याची व काढून नेण्याची, किंवा त्यात गुरे चारण्याची परवानगी देण्यात आली असेल, आणि अशा कोणत्याही व्यक्तीने अशा वनात ज्यांना कामावर ठेवले असेल त्या प्रत्येक व्यक्तीने, आणि अशा वनालगतच्या कोणत्याही गावातील ज्या व्यक्तीस शासनाने कामावर ठेवले असेल किंवा समाजास उपयुक्त अशी सेवा करण्यासारखी ज्यास शासनाकडून वित्तलब्धी मिळत असेल अशा प्रत्येक व्यक्ती, त्यास कोणताही वन अपराध केल्याची किंवा असा अपराध करण्याच्या इराद्याची जी माहिती असेल, ती निष्कारण विलंब न लावता नजीकच्या वन अधिका-यास किंवा पोलीस अधिका-यास देणे बंधनकारक असेल आणि तो कोणत्याही वन अधिका-याला किंवा पोलीस अधिका-याला आवश्यकता असो वा नसो, पुढील बाबीसाठी पाऊले उचलेल-

(ए) अशा वनात कोणतीही आग लागल्याचे त्यास माहित असेल किंवा कळले असेल तर अशी कोणतीही आग विझविणे;

(बी) अशा वनाच्या जवळपास कोणतीही आग लागल्याचे त्यास कळले असेल किंवा माहित झाले असेल तर अशी आग अशा वनास लागू नये म्हणून आपल्या अधिकारात असलेल्या कोणत्याही वैध उपायांनी ती थांबविण्यासाठी ताबडतोब उपाययोजना करणे आणि जेव्हा कोणताही वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी त्याची मदत मागेल तेव्हा त्याला सहाय्य करणे;

(सी) अशा वनात कोणताही वन अपराध होऊ नये, म्हणून उपाययोजना करणे;

(डी) अशा वनात असा कोणताही वन अपराध करण्यात आला आहे, असे समजण्यास कारण असेल, त्यावेळेस अपराध्यांचा शोध घेणे व त्यास अटक करणे;

(२) उपरोक्त गोष्टी करणे ज्यास भाग आहे असा कोणताही व्यक्ती वैध सबबीखेरीज (हे सिध्द करण्याचा बोजा अशा व्यक्तीवर राहील) जेव्हा पुढील बाबीविषयी कसूर करेल, म्हणजे-

(ए) पोट कलम (१) अन्वये आवश्यक कोणतीही माहिती निष्कारण विलंब न लावता नजीकच्या वन अधिका-यास किंवा पोलीस अधिका-यास देणे;

(बी) राखीव किंवा संरक्षित वनात लागलेली कोणतीही आग विझविण्यासाठी पोट कलम (१) अन्वये आवश्यक उपाययोजना करणे;

(सी) अशा वनाच्या जवळपास कोणतीही आग असतांना ती अशा वनात पसरु नये म्हणून पोट कलम (१) अन्वये आवश्यक प्रतिबंध करणे; अथवा

(डी) अशा वनात कोणताही वन अपराध घडू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी, किंवा अशा वनात असा कोणताही अपराध घडला आहे असे वाटण्यास कारण असेल तेव्हा, अपराध्यांचा शोध करण्यासाठी आणि त्यास अटक करण्यासाठी वन अधिका-यांने किंवा पोलीस अधिका-याने त्याची मदत मागितली असता त्यास सहाय्य करणे;

तर अशी व्यक्ती एक महिना मुदतीपर्यंतचा कारावास किंवा दोनशे रुपये पर्यंतचा द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

**८०. शासनाची व इतर व्यक्तींची सामाईक मालमत्ता असलेल्या वनाचे व्यवस्थापन.-** (१) कोणत्याही वनात किंवा पडीत जमिनीत किंवा त्यापासून मिळणा-या सर्व वन उत्पादनात किंवा अशा उत्पादनाच्या कोणत्याही भागात शासनाचा आणि कोणत्याही व्यक्तीचा सामाईक हितसंबंध असेल तर, राज्य शासन एकतर -

(ए) अशा वनाचे किंवा पडीत जमिनीचे किंवा उत्पादनाचे व्यवस्थापन, त्यात अशा व्यक्तीचे हितसंबंधी हिशेब ठेवून स्वत:कडे घेवू शकेल; अथवा

(बी) अशा प्रकारे सामाईक हितसंबंध असणा-या व्यक्तीव्दारे त्या वनाचे, पडीत जमिनीचे किंवा उत्पादनाचे योग्यरित्या व्यवस्थापन केले जातील व त्यात हितसंबंध असणा-या सर्व पक्षकारांच्या हिताच्या दृष्टीने व्यवस्थापनाकरीता त्यास आवश्यक वाटतील, असे विनियमन जारी करु शकेल.

(२) जेव्हा पोट कलम (१) च्या खंड (अ) अन्वये राज्य शासन कोणत्याही वनाचे, पडीत जमिनीची किंवा उत्पादनाचे व्यवस्थापन स्वत:कडे घेईल तेव्हा प्रकरण २ व ४ मधील तरतुदी अशा वनास किंवा

पडीत जमिनीस किंवा उत्पादनास लागू होतील, असे राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेव्दारे जाहीर करेल, आणि तद्नंतर अशा तरतुदी त्याप्रमाणे लागू होतील.

**८०ए. शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिका-याच्या विवक्षित जमिनीस हया अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्याचे शासनाचे अधिकार.-** राज्य शासनास राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन राज्य शासनाची किंवा स्थानिक प्राधिका-यांची मालमत्ता असलेल्या, कालव्याच्या काठावर किंवा रस्त्याच्या बाजुला असलेल्या सर्व किंवा कोणत्याही जमिनीना हया अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदी लागू होतील, असे जाहीर करता येईल आणि त्यानंतर अशा तरतुदी अशा जमिनीना त्याप्रमाणे लागू होतील.

**८१. ज्या सेवेबद्दल शासकीय वनाच्या उत्पादनातील हिस्स्याचा उपभोग घेण्यात येत असेल ती सेवा करण्यात कसूर करणे.-** जे कोणतेही वन शासकीय मालमत्ता असेल किंवा ज्यावर शासनाचे स्वामित्वाधिकार असतील किंवा ज्या वनापासून मिळणा-या वन उत्पादनाच्या कोणत्याही भागावर शासनाचा हक्क असेल, त्या वनाच्या उत्पादनातील एखादा हिस्सा, अशा वनाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा योग्य रितीने करण्याच्या शर्तीवर मिळण्याचा कोणत्याही व्यक्तीस हक्क असेल तर असा हिस्सा मिळण्याचा हक्क, अशा प्रकारची सेवा त्याप्रमाणे आता करण्यात येत नाही, या बाबतीत राज्य शासनाची खात्री होईल, अशा रितीने सिध्द झाली असता असा हिस्सा सरकारजमा केला जाण्यास पात्र राहील.

परंतु, राज्य शासनाने यानिमित्त रितसर नेमलेल्या अधिका-याने अशा प्रकारच्या हिस्स्यावर हक्क असणा-या व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्याशिवाय आणि अशा प्रकारची सेवा योग्य रितीने केल्याबद्दल काही पुरावा त्या व्यक्तीने सादर केला असेल तर तो लक्षात घेतल्याशिवाय असा हिस्सा मिळण्याचा हक्क सरकारजमा केला जाणार नाही.

**८२. शासनाला येणे असलेली रक्कम वसूल करणे.-** या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमांतर्गत केलेल्या कोणत्याही नियमाखाली किंवा कोणत्याही वन उत्पादनाच्या किंमतीबाबत किंवा अशा प्रकारचा उत्पादनाच्या संबंधात या अधिनियमांची अंमलबजावणी करताना झालेल्या खर्चाबद्दल शासनाला देय होणा-या सर्व रक्कमा, त्या देय झाल्यानंतर भरण्यात आल्या नाहीत तर, जणू ती जमीन महसूलाची थकबाकी होती, त्याप्रमाणे अंमलात असलेल्या कायद्याखाली वसूल करण्यात येतील.

**८३. अशा रक्कमेबद्दल वन उत्पादनावर धारणाधिकार असणे.-** (१) कोणत्याही वन उत्पादनाबद्दल किंवा त्यांच्या संबंधित अशा रितीने कोणतीही रक्कम देय असेल तेव्हा त्या रक्कमेचा अशा उत्पादनावर प्रथम भार आहे, असे मानले जाईल व अशी रक्कम अदा होईपर्यंत वन अधिका-याव्दारे त्या उत्पादनाचा ताबा घेता येईल.

(२) अशी रक्कम देय झाली असतांना ती देण्यात आली नाही तर, वन अधिका-यास, असे उत्पादन जाहीर लिलावाव्दारे विकता येईल आणि विक्रीउत्पन्नाचा विनियोग सर्वप्रथम अशा भाराबद्दल देय होणा-या रक्कमेची फेड करण्यासाठी करण्यात येईल.

(३) अतिरिक्त रक्कम, जर असेल तर त्यावर हक्क असणा-या व्यक्तीने जर विक्रीच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत दावा प्रस्तुत केला नाही, तर ती समपृहत केली जाईल.

**८४. या अधिनियमान्वये जमिनीची आवश्यकता असेल तेव्हा भूमि संपादन अधिनियम, १८९४ खाली सार्वजनिक प्रयोजनासाठी तिची आवश्यकता आहे असे मानण्यात येईल.-** या अधिनियमाच्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही जमिनीची आवश्यकता आहे, असे राज्य शासनास वाटत असेल तेव्हा अशी जमीन, भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ च्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे, असे मानण्यात येईल.

**८५. बंधपत्रान्वये येणे असलेल्या शास्तीची वसुली करणे.-** (१) जेव्हा कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीस अनुसरुन किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे पालन करतांना, कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास किंवा कोणतेही कृत्य करण्यास कोणत्याही बंधपत्रान्वये किंवा संलेखान्वये स्वत:ला बांधील करतो किंवा ती किंवा ती आणि त्याचे नोकर व अभिकर्ते कोणत्याही कृत्यापासून दूर राहतील, असा कोणत्याही बंधपत्रान्वये किंवा संलेखान्वये करार करतो तेव्हा, भारतीय करार अधिनियम, १८७२ च्या कलम ७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अशा बंधपत्रातील किंवा संलेखातील शर्तीचा भंग झाल्याच्या स्थितीत, त्या बाबतीत द्यावयाची रक्कम म्हणून जी रक्कम अशा बंधपत्रात किंवा संलेखात नमूद केली असेल ती संपूर्ण रक्कम, त्याने अशा रितीने शर्तीचा भंग केला असता, जणू ती जमीन महसूलाची थकबाकी होती, त्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल केली जाईल.

(२) जर,

(ए) अशा बंधपत्रात किंवा संलेखाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाला आहे किंवा कसे;

(बी) अशा रितीने शर्तीचा भंग केल्याबद्दल भरावयाची रक्कम;

(सी) अशी रक्कम भरण्यास जबाबदार असलेला व्यक्ती किंवा असलेली व्यक्ती,

या विषयी कोणताही प्रश्न उपस्थित झाला असेल तर, तो उप-विभागीय वन अधिका-यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाही, अशा ज्या अधिका-यास राज्य शासनाव्दारे या बाबतीत प्राधिकृत करण्यात आले असेल, त्याच्याकडे निर्णयार्थ संदर्भांकित करण्यात येईल आणि असा अधिकारी संबंधित व्यक्तीस नोटीस देऊन आणि त्याच्या हरकती असतील, त्या विचारात घेऊन त्यावर निर्णय देईल. अशा अधिका-यांच्या निर्णयामुळे व्यथित असलेल्या व्यक्तीस अशा निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसाच्या आत राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन याबाबतीत नेमेल, अशा इतर अपील

प्राधिकरणाकडे अपील करता येईल. अशा अधिका-याचा निर्णय, उक्त अपील प्राधिकरणाकडे केलेल्या अपिलाच्या आणि उक्त प्राधिकरणाने अपिलावर दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून अंतिम राहील.

**८५ए. केन्द्र शासनाच्या हक्कांचा बचाव.-** या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमुळे कोणत्याही राज्याच्या शासनास जी मालमत्ता त्या राज्याकडे निहित झाली नसेल, त्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधाने कोणताही आदेश देण्याचा किंवा त्या बाबतीत कोणतीही गोष्ट करण्यांचा किंवा अन्यथा केन्द्र शासनाच्या किंवा दुस-या कोणत्याही राज्याच्या कोणत्याही हक्कांना बाधा येईल, असे कोणतेही कृत्य त्या संबंधित शासनाच्या संमतीशिवाय करण्याचा प्राधिकार असणार नाही.

**८६. रद्द केलेले विधी.-** हे कलम सन १९४८ च्या अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये रद्द करण्यात आले आहे.

## अनुसूची

**[सन १९४८ च्या अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये रद्द करण्यात आली आहे]**

# भारतीय वन अधिनियम अंतर्गत प्रदत्त वैधानिक शक्ती

- शासन अधिसूचना दिनांक ३ एप्रिल, १९९७
- शासन अधिसूचना दिनांक २१ मे, २०१३
- शासन अधिसूचना दिनांक १९ ऑगस्ट, २०१४
- शासन अधिसूचना दिनाक २२ जुलै, २०१५
- भारतीय राजपत्र दिनांक ८ जानेवारी, २०१८

haudhari.
21, 10:17

असा. क्र. १२४

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, एप्रिल ३, १९९७/चैत्र १३, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ एप्रिल १९९७

**वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक एमआयएस. १०९५/सीआर-९७/फ-६.—वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा महाराष्ट्र अधिनियम सोळा) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, याचे कलम ६७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून महाराष्ट्र शासन याद्वारे,—

उक्त अधिनियमाच्या कलम ६७ च्या प्रयोजनाकरिता—

(अ) मुंबई शहरातील सर्व महानगर दंडाधिकारी,

(ब) राज्यातील सर्व जिल्ह्यांतील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
यांना विशेष रीत्या (अधिकार) प्रदान करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. सु. कु. खेतरपाल,
शासनाचे सह सचिव.

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक २७] बुधवार, मे २२, २०१३/ज्येष्ठ १, शके १९३५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक ६१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मे २०१३

### अधिसूचना

**भारतीय वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक एस-३०/०२/२०१३/प्र.क्र. २१/फ-६.— ज्याअर्थी, तत्कालीन मुंबई शासनाच्या महसूल विभागाने काढलेली शासकीय अधिसूचना, क्रमांक जी. एन. ४३३५/३९(ड), दिनांक १ ऑक्टोबर १९४२ द्वारे, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या विभिन्न कलमांन्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या विवक्षित गोष्टी करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांना नियुक्त करून त्यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आयएफए-१०६४/७११६८-झेड, दिनांक २२ नोव्हेंबर १९६६ द्वारे विवक्षित वन अपराध अभिसंधानाकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या पोट-कलम (१) अन्वये वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन अधिकारी आणि वनक्षेत्र अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, सन १९७४ मध्ये विधि संस्थापित असलेले आणि विभिन्न वनीकरणाच्या प्रयोजनांसाठी विवक्षित वन जमीन आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित (एफ.डी.सी.एम.लि.) यांच्या विवक्षित अधिकाऱ्यांना, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एफडीसी-११७४/५०३६८-दोन/कार्यासन फ-५, दिनांक ६ ऑगस्ट १९७५ द्वारे उक्त अधिनियमा-अन्वये वन अधिकाऱ्याने जे अधिकार वापरणे आवश्यक आहे, अशा विवक्षित अधिकारांचा वापर करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यासाठी लागू उक्त अधिनियमांच्या कलम ६१क च्या पोट-कलम (१) च्या प्रयोजनांसाठी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक टीआरएस-१०८३/९१८८२ (दोन)/प्र. क्र. ८७/फ-६, दिनांक ३१ मे १९८५ द्वारे विवक्षित विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, संलग्न अधिकारी आणि काष्ठ निष्कासन (लॉगिंग) अधिकारी यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यासाठी लागू उक्त अधिनियमांच्या कलम ६१ग च्या प्रयोजनांसाठी शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक टीआरएस-१०८३/९१८८२(तीन)/प्र.क्र. ८७/फ-६, दिनांक ३१ मे १९८५ द्वारे, प्रादेशिक वनवृत्ताच्या प्रभारी वन संरक्षकास अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एस-३०/१०/२०००/प्र.क्र. ४५६/फ-५, दिनांक २१ एप्रिल २००१ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१) अन्वये वापरता येण्यायोग्य असलेले अधिकार विवक्षित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे विनिहित करण्यात आले होते आणि तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) मधील विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी परिमंडळाच्या सर्व प्रभारी वनपालांकडे देखील अधिकार विनिहित करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, वन विभागाच्या संघटनात्मक संरचनेतील बदल आणि त्यानुषंगाने विवक्षित पदांची होणारी श्रेणीवाढ तसेच, वन अधिकाऱ्यांच्या विवक्षित पदांच्या पदनामात झालेला बदल विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या विभिन्न कलमान्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या विवक्षित गोष्टी करण्याकरिता वन विभागाच्या अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यासाठी आणि त्यांना अधिकार प्रदान करण्यासाठी एक नवीन अधिसूचना काढणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र राज्यासाठी लागू भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलमे २, १७, २२, २५, २६ (१) (ग), २६ (२)(क), २६ (४), ३३ (३), ३८, ४४, ४५, ४६, ४७, ५०, ५२, ५३, ५६, ५७, ६१, ६१ क, ६१ ग, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ७०, ७२, ७९, ८३ आणि ८५ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या विद्यमान सर्व उपरोल्लिखित शासकीय अधिसूचनांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे,—

(१) पुढील तक्त्यामधील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या वन विभागातील आणि वन महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित (एफ.डी.सी.एम.लि.) यातील अधिकाऱ्यांना स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, उक्त अधिनियमाच्या विभिन्न कलमान्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही गोष्टी करण्यासाठी नियुक्त करीत आहे :—

तक्ता

| अ. क्र. (१) | अधिकारी (२) | कलमे (३) |
|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित. | ६१ग, २६ (४) आणि ३३ (३). |
| २ | मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित. | २१, २६ (४), ३३ (३), ५३, ५६, ५७, ६५, ६८ आणि ७२. |
| ३ | मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी. | १७, २५, २६ (१) (ग), ३८, ४६, ४७, ५०, ६१ आणि ८३. |
| ४ | उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, काष्ठ निष्कासन (लॉगिंग) अधिकारी, आलापल्ली, गडेगाव, नवेगाव, पुसद आणि वणी. | ६१ क (१) |
| ५ | विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | ४४, ५२, ५३, ६१, ६४, ६५, ६८, ७०, ७२, ७९. |
| ६ | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | २६ (४), ३३ (३), ५३, ५६, ५७, ६५ आणि ७२. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७ | वनसर्वेक्षक, रेंजर सर्वेक्षक, वनपाल, वनरक्षक (महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यामधील वनपाल व वनरक्षक यांसह). | ७२ (१) (क) |
| ८ | मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागाचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक (महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यामधील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांसह). | २६ (२)(क), ३४,४४, ४५, ५२, ६३, ६४, ६६, ७० आणि ७९. |

**स्पष्टीकरण.**—वरील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये, त्यांना समकक्ष असलेल्या, वन विभागाच्या वन्यजीव शाखेतील अधिकाऱ्यांचाही समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा समावेश आहे.

(२) (अ) उक्त अधिनियमाच्या कलम ८५ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रश्नावर निर्णय देण्यासाठी सर्व मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांना प्राधिकृत करीत आहे.

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम ८५ च्या पोट-कलम (२) अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

(३) उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये राखीव वनातील सार्वजनिक किंवा खाजगी रस्ते आणि जलमार्ग बंद करण्याकरिता वन अधिकारी ज्यांच्या पूर्व परवानगीने अधिकारांचा वापर करू शकेल, असा अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्याला प्राधिकृत करीत आहे ;

(४) उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ व ६६ यांच्या तरतुदींची आणि मुंबई वन नियम, १९४२ याच्या नियम ८५ ची अंमलबजावणी करण्याकरिता सीमाशुल्क, मोटार वाहन, राज्य उत्पादन शुल्क, सामाजिक वनीकरण आणि आदिवासी विकास विभाग यांमधील सर्व अधिकाऱ्यांना वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(५) (अ) उक्त अधिनियमाच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी सर्व जिल्हाधिकारी, सहायक जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकारी यांना, वेळोवेळी महसूल विभागाच्या व्यवस्थापनाखाली असतील अशा, त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील राखीव किंवा संरक्षित वनांच्या बाबतीत वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(ब) उक्त अधिनियमांच्या कलम ६८ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, वरील खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील राखीव वनाबाबत आणि संरक्षित वनाबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ६८ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार निहित करीत आहे ;

(क) सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील राखीव वनांबाबत आणि संरक्षित वनांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ६१ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार विहित करीत आहे.

(६) उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ आणि ६६ प्रयोजनासाठी सर्व मंडळ अधिकारी, तलाठी आणि पोलीस पाटील यांना, वेळोवेळी महसूल विभागाच्या व्यवस्थापनाखाली असतील अशा, त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील वनांच्या बाबतीत वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(७) पुणे जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे, सेना रसद विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत मुख्य सेना रसद अधिकारी, पुणे यांस, उक्त अधिनियमाच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(८) पुणे जिल्ह्यातील तृण अधीक्षक, सेना रसद विभाग, पुणे आणि सेना रसद कुरण चौकीदार यांना, उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ व ७० यांच्या प्रयोजनासाठी, त्यांची कर्तव्ये ज्या क्षेत्रापुरती मर्यादित असतील त्या संपूर्ण क्षेत्रासाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(९) अहमदनगर जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे सैन्याच्या रिमाउंट विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत समादेशक अधिकारी, रिमाउंट आगार, अहमदनगर यांस उक्त अधिनियमांच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ; आणि

(१०) अहमदनगर जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे सैन्याच्या तृणक्षेत्र विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत व्यवस्थापक, सेना तृणक्षेत्र, अहमदनगर यांस, उक्त अधिनियमांच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेद्वारे अधिक्रमण करण्यात आलेल्या आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनांद्वारे किंवा आदेशांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीच्या परिणामी, जी कोणतीही कार्यवाही सुरु असेल, अशा कोणत्याही कार्यवाहीवर, या अधिसूचनेतील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहोचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजीव गौड,
शासनाचे सहसचिव.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक १४] मंगळवार, ऑगस्ट १९, २०१४/श्रावण २८, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक १४

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

**OFFICE OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA**

Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai 400 035, dated the 19th August 2014.

**Preamble**

No. RB/TC/e-11019(15)(2014)/Notification-3/Bamboo-MFP/741.—The following notification issued by the Governor of Maharashtra is published for general information :—

WHEREAS under sub-paragraph (1) of Paragraph 5 of the Fifth Schedule of the Constitution, the Governor may, by public notification direct that any particular Act of Parliament or of the Legislature of the State shall not apply to a Scheduled Area or any part thereof in the State or shall apply to a Scheduled Area or any part thereof in the State subject to the exceptions and modifications specified in the notification ;

AND WHEREAS the Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas Act), 1996 is an Act of self empowerment of the village community which seeks to protect the customary law, social and religious practices, and traditional management practices of community resources ;

AND WHEREAS as per the provisions of Section 4(m) (ii) of The Provisions of the Panchayat (Extension to the Scheduled Areas) Act, 1996 the appropriate Panchayats and the Gram Sabhas are to be endowed specifically with the ownership of minor forest produce :

AND WHEREAS the Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas and the Maharashtra Minor Forest Produce (Regulation of Trade) (Amendment) Act, 1997 has defined Minor Forest Produce to mean "forest produce specified in the Schedule appended to this Chapter" ;

AND WHEREAS the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers ( Recognition of Forest Rights ) Act , 2006 has provided a wider and comprehensive definition of Minor Forest Produce ;

audhari.



**AND WHEREAS** the definition of minor forest produce under the Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas and the Maharashtra Minor Forest Produce ( Regulation of Trade) (Amendment ) Act, 1997 has been found to be not comprehensive and failed to take into account some of the minor forest produce recognized under the subsequent The Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights ) Act , 2006, thus denying the fruits of ownership over many MFPs to the Scheduled Area Gram Sabhas ;

**AND WHEREAS** the above anomaly has led to denial of livelihood opportunities to village communities in the Scheduled Areas, primarily the members of the Scheduled Tribes ;

**AND WHEREAS** Article 46 of the Constitution of India casts duty on the State to promote with special care, the educational and economic interests of Scheduled Tribes ;

**AND WHEREAS** the Governor of Maharashtra has decided, for reasons outlined above, that the scope of the minor forest produce needs to be redefined to ensure economic upliftment and empowerment of the Gram Sabhas ;

**NOW, THEREFORE,** in exercise of the powers conferred by sub- paragraph (1) of Paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby makes the following notification :—

## *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

In exercise of the powers conferred by sub-paragraph (1) of Paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby directs that the Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas and the Maharashtra Minor Forest Produce (Regulation of Trade) (Amendment) Act, 1997 and the Indian Forest Act, 1927, in its application to the State of Maharashtra, shall apply to the Scheduled Areas with the following modifications :—

## PART I

## MODIFICATIONS TO THE MAHARASHTRA TRANSFER OF OWNERSHIP OF MINOR FOREST PRODUCE IN THE SCHEDULED AREAS AND THE MAHARASHTRA MINOR FOREST PRODUCE (REGULATION OF TRADE) (AMENDMENT) ACT, 1997

In the Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas and the Maharashtra Minor Forest Produce (Regulation of Trade) (Amendment) Act, 1997,—

(*i*) in section 3,—

(*a*) for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

" (*a*) " minor forest produce" includes all non-timber forest produce of plant origin including bamboo, brush wood, stumps, cane, tussar, cocoons, honey, wax, lac, tendu or Kendu leaves, medicinal plants and herbs, roots, tubers and the like ";

(*b*) clause (*c*) shall be deleted ;

(*ii*) in section 4,—

(*a*) In sub-section (*1*), after the word " Panchayat " the words " and Gram Sabha " shall be inserted ;

(*b*) in sub-section (*3*), for the words " State Government " the words " Rural Development Department of the State Government " shall be substituted ;

(*iii*) in section 5,—

(*a*) for the word "Panchayats" at both the places where it occurs, the words "Panchayats and Gram Sabhas" shall be substituted ;

(*b*) to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :—

" Provided that while finalising such management plan or the Rules, the suggestions made by the Panchayats and Gram Sabha about traditional sustainability and conservation practices and equitable management of such minor forest produce shall be suitably incorporated." ;

(*c*) sub-section (*2*) shall be deleted;

(*iv*) in section 7, sub-section (*2*) shall be deleted;

(*v*) the Schedule shall be deleted.

## PART II

## MODIFICATIONS TO THE INDIAN FOREST ACT, 1927, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

In the Indian Forest Act, 1927, in its application to the State of Maharashtra, in section 2, in clause (7), the words "bamboos, stumps, brushwood and canes" shall be deleted.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Secretary to Governor.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक ५७(१)] शनिवार, ऑगस्ट १, २०१५/श्रावण १०, शके १९३७ [पृष्ठे १, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ११६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जुलै २०१५

अधिसूचना

भारतीय वन अधिनियम, १९२७

क्रमांक टिआरएस. ०६/२०१५/प्र.क्र. १०३/फ-३.—महाराष्ट्र राज्यासाठी लागू, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ या १६) च्या कलम २ याचा- कलम २६ खाली उप-कलम (१क) च्या पोट-कलम (क) आणि कलम ४१ क च्या उप-कलम (३) यांचेसह याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा आणि त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उक्त अधिनियमाच्या कलमान्वये वन अधिकाऱ्यांना करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही गोष्टी करण्यासाठी प्राधिकृत व नियुक्त करीत आहे :—

तक्ता

| अ. क्र. (१) | | अधिकारी (२) | कलम (३) |
|---|---|---|---|
| १ | (एक) | मुख्य वनसंरक्षक, मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक एफ.डी.सी.एम. लिमीटेड, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, उप संचालक, विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम.लिमिटेड, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक एफ.डी.सी.एम. लिमिटेड, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल आणि वनरक्षक (एफ.डी.सी.एम. लिमिटेड यामधील वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांसह). | २६ (१क) (क) |
| | (दोन) | महसूल विभागाच्या व्यवस्थापनेखाली असलेल्या राखीव वनांसाठी ज्यांच्या अधिकारक्षेत्राखाली असे राखीव वन आहेत, असे जिल्हाधिकारी व तहसीलदार. | |
| २ | | मुख्य वनसंरक्षक, मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक एफ.डी.सी.एम. लिमिटेड, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, उप संचालक, विभागीय व्यवस्थापक एफ.डी.सी.एम.लिमिटेड, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी, उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक एफ.डी.सी.एम. लिमिटेड, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, एफ.डी.सी.एम. लिमिटेड. | ४१ क (३) |

स्पष्टीकरणः—वरील तक्त्यातील अ. क्र. १ (एक) आणि २ समोर स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये, त्यांना समकक्ष असलेल्या वन विभागाच्या वन्यजीव शाखेतील अधिकाऱ्यांचाही समावेश असेल, तथा, मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा समावेश आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश का. महाजन,
शासनाचे सह सचिव.

रजिस्ट्री सं० डी० एल०—(एन)04/0007/2003—18 REGISTERED NO. DL—(N)04/0007/2003—18

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II — खण्ड 1
PART II — Section 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं० 5] नई दिल्ली, सोमवार, जनवरी 8, 2018/पौष 18, 1939 (शक)
No. 5] NEW DELHI, MONDAY, JANUARY, 8, 2018/PAUSHA 18, 1939 (SAKA)

इस भाग में भिन्न पृष्ठ संख्या दी जाती है जिससे कि यह अलग संकलन के रूप में रखा जा सके।
Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

## MINISTRY OF LAW AND JUSTICE
### (Legislative Department)

*New Delhi, the 8th January,* 2018/*Pausha* 18, 1939 (*Saka*)

The following Act of Parliament received the assent of the President on the 5th January, 2018, and is hereby published for general information:—

## THE INDIAN FOREST (AMENDMENT) ACT, 2017

No. 5 OF 2018

[*5th January,* 2018.]

An Act further to amend the Indian Forest Act, 1927.

Be it enacted by Parliament in the Sixty-eighth Year of the Republic of India as follows:—

1. (*1*) This Act may be called the Indian Forest (Amendment) Act, 2017. Short title and commencement.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 23rd day of November, 2017.

2. In the Indian Forest Act, 1927, in section 2, in clause (*7*), the word "bamboos" shall be omitted. Amendment of section 2 of Act 16 of 1927.

Ord. 6 of 2017. **3.** (*1*) The Indian Forest (Amendment) Ordinance, 2017 is hereby repealed. Repeal and savings.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the Indian Forest Act, 1927, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken under the corresponding provisions of the said Act, as amended by this Act. 16 of 1927.

DR. G. NARAYANA RAJU,
*Secretary to the Govt. of India.*

## CORRIGENDA

In the MENTAL HEALTHCARE ACT, 2017 (10 OF 2017) as published in the Gazette of India, Extraordinary, Part II, Section 1, Issue No. 10, dated the 7th April, 2017,—

| Page No. | Line(s) | *For* | *Read* |
|---|---|---|---|
| 2 | 20 | "sub-section (*1*) of section 80" | "sub-section (*1*) of section 73" |
| 4 | 6 | "clause (*x*)" | "clause (*y*)" |
| 6 | 16 | "clause (*a*) of sub-section (*1*) of section 91" | "clause (*a*) of sub-section (*1*) of section 82" |
| 6 | 25 | "section 103" | "section 94" |
| 10 | 15 and 16 | "clause (*e*) of sub-section (*4*)" | "cloause (*e*) of this sub-section" |
| 20 | 10 | ":clause (*q*)" | "clause (*r*)" |
| 30 | 31 | "section 85" | "section 77" |
| 43 | 4 | "sub-section (*5*)" | "sub-section (*6*)" |
| 47 | 29 and 30 | "sub-clause (*ii*) of clause (*f*) of sub-section (*1*) of section 2" | "sub-clause (*ii*) of clause (*g*) of sub-section (*1*) of section 2" |
| 47 | 31 and 32 | "clause (*w*) of sub-section (*1*) of section 2" | "clause (*x*) of sub-section (*1*) of section 2" |
| 48 | 14 | "manner" | "the manner" |
| 48 | 15 | "a State" | a State under sub-section (*3*) of section 73" |
| 48 | 16 and 17 | "clause (*e*) of sub-section (*2*) of section 82" | "clause (*e*) of sub-section (*2*) of section 74" |
| 49 | 16 | "confirm under sub-section (*6*) of section 103" | "conform under sub-section (*7*) of section 103" |
| 49 | 25 | "manner" | "the manner" |
| 49 | 39 | "provisions" | "the provisions" |
| 50 | 1 | "manner" | "the manner" |
| 50 | 3 to 5 | • | *Omitted* |
| 50 | 6 | "clause (*n*)" | "clause (*m*)" |
| 50 | 8 | "clause (*o*)" | "clause (*n*)" |
| 51 | 5 | "14 of 1897." | "14 of 1987." |

UPLOADED BY THE GENERAL MANAGER, GOVERNMENT OF INDIA PRESS, MINTO ROAD, NEW DELHI–110002
AND PUBLISHED BY THE CONTROLLER OF PUBLICATIONS, DELHI–110054.

MANOJ KUMAR Digitally signed by MANOJ KUMAR

GMGIPMRND—3599GI(S3)—08-01-2018.